आयपीएल सामना क्र.११
Vs
राजस्थान रॉयल्स विरुद्ध
दिल्ली कॅपिटल्स्
वेळ : ३.३० वा. स्थळ : गुवाहाटी

अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

आयपीएल सामना क्र.१२
Vs
मुंबई इंडियन्स विरुद्ध
चेन्नई सुपरकिंग्ज
वेळ : ७.३० वा. स्थळ : वानखेडे

www.surajyadigital.com | शनिवार, दि.८ एप्रिल २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : १८९ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

# ‘रात गई; बात गई’ बोलेंगे ‘तो बात बनेगी’



## चंद्रकांत पाटलांकडून उध्दव ठाकरेंना युतीचे आमंत्रण


✔ सुराज्य/मुंबई

**देवेंद्र फडणवीस यांचे मन मोठे आहे. ते सगळे विसरतील. जर उध्दव ठाकरे ‘रात गई; बात गई’ असे बोलले तर ‘ तो बात बनेगी’. पुन्हा एकदा सर्वकाही जुळून येईल आणि अखंड हिंदुत्वासाठी पुन्हा सेना(उध्दव ठाकरे गट)-भाजप एकत्र येणे महाराष्ट्र हिताचे ठरेल, अशा शब्दात भाजपने नेते व उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी अप्रत्यक्षपणे उध्दव ठाकरे यांना पुन्हा एकदा युतीचे आमंत्रण दिले आहे. ‘आम्ही दरवाजा बंद करत नाही, आमचा दरवाजा नेहमीच उघडा असतो’ असे सांगत भाजप ठाकरेंसोबतच्या युतीसाठी इच्छुक असल्याचे बोलून दाखवले. त्यामुळे महाराष्ट्रात पुन्हा एकदा वेगळी चर्चा सुरू झाली आहे.**

एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत मंत्री चंद्रकांत पाटील यांनी याबाबत संकेत दिल्यानंतर राष्ट्रवादीचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी ‘असे घडले तर त्याचे स्वागतच केले जाईल’ अशी प्रतिक्रिया दिली आहे.

स्पष्ट बोलणे टाळले असले तरी अस्पष्टपणे का होईना; चंद्रकांत पाटील यांनी भाजपमध्ये चाललेल्या हालचाली अप्रत्यक्षपणे बोलून दाखवल्या.

### पवारांच्या मागे गेल्याने माती



भाजपसोबतच्या युतीसंदर्भात उद्धव ठाकरेंकडून काही संकेत मिळाले आहेत का? या प्रश्नाच्या उत्तरादाखल बोलताना ठाकरेंकडून काहीही संकेत आलेले नाहीत. मी जसा भाजपचा नेता आहे, तसाच एक माणूस अन् महाराष्ट्राचा नागरिक आहे. घडणाऱ्या घटनांमुळे मी व्यथित होतो, म्हणून मी उद्धव ठाकरेंनी हिंदुत्वासाठी भाजपबरोबर यावे असे म्हणतो. माझ्या पक्षात इतके स्वातंत्र्य आहे. शरद पवारांच्या मागे गेल्याने पवारांनी अनेक नेत्यांची माती केली. तसेच ते पक्ष म्हणून उद्धव ठाकरेंची माती करतील, अशी भविष्यवाणीही यावेळी चंद्रकांत पाटलांनी केली.

### टोकेंगे नही; लेकीन छोडेंगे भी नही

देवेंद्र फडणवीसांचे मन मोठे आहे. कोणी काहीही बोलले तर सहन करणार नाही. हम किसी को टोकेंगे नही, किसीने टोका तो छोडेंगे भी नही. आम्ही कुणालाही त्रास देत नाही. उद्धव ठाकरे रात गई, बात गई’ असे म्हणाले तर एकत्र येता येईल. मात्र, नही मेरा दरवाजा बंद है असे उद्धव ठाकरेंनी ३३ महिने केले. त्यांनी एकदाही असे म्हटलं नाही की, तू घरी ये, आपण एकत्र बसू. देवेंद्र फडणवीस असे दरवाजे बंद करणारे नाहीत, अशा शब्दात भाजपकडील बाजूही चंद्रकांत पाटील यांनी समोर आणली.

### आम्ही स्वागत करू

चंद्रकांत पाटील यांनी यांच्या मुलाखतीनंतर मुंबईत राष्ट्रवादीचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी बोलताना ते म्हणाले की एकनाथ शिंदे आणि उद्धव ठाकरेंना एकत्र आणण्यासाठी चंद्रकांत पाटील प्रयत्न करणार असतील, तर आम्ही त्याचे स्वागतच करू. ते चंद्रकांत पाटलांच्या हातून घडणारे चांगले काम असले. चांगल्या गोष्टीला आमचे समर्थन असते.

## नवऱ्याने बायकोचे कान उपटून काढले

✔ सुराज्य/अक्कलकोट

अक्कलकोट तालुक्यात कौटुंबिक वादातून नवऱ्याने बायकोचे कान धारदार हत्याराने उपटून काढल्याची घटना घडली. आरोपी नवरा अंबाजीआप्पा व्हावण्णा जमादर (रा.उडगी) यांच्याविरूद्ध दक्षिण पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा करण्यात आला आहे.

ही घटना ५ एप्रिल रोजी सायंकाळी राहत्या घरी घडली. याबाबत पोलीस सुत्राकडुन मिळालेली अधिक माहिती अशी की, पत्नी विजयालक्ष्मी हीस माझे वडिल कोठे आहेत त्यांना बघतो असे म्हणून सायंकाळी झाडलोट करीत असताना कोणत्या तरी धारदार शस्त्राने कान कापले. नवऱ्याने रागाच्या भरात बायको विजयालक्ष्मी जमादर हिच्या कानाचा गड्डा धारदार हत्याराने उपटून काढला. शेजाऱ्यांनी मध्यस्थी करून पीडित विवाहित महिलेला अक्कलकोट येथील शासकिय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले होते. त्यानंतर पुढील उपचारासाठी तिला सोलापूर शहरातील सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. अधिक तपास पो. नाईक मल्लिनाथ कलशेट्टी हे करीत आहेत.

### लखनौचे नवाब पडले भारी
## हैदराबादचा दुसरा पराभव



✔ **लखनौ** : कृणाल पांड्याच्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर लखनौ सुपर जायंट्सने सनराजयर्स हैदराबादचा पाच विकेटने पराभव केला. लखनौच्या गोलंदाजांनी हैदराबादच्या फलंदाजांना १२१ धावांपर्यंत रोखले, त्यानंतर फलंदाजांनी हे आव्हान सहज पार केले. लखनौने हैदराबादचा पाच विकेट आणि २४ चेंडू राखून पराभव केला. कृणाल पांड्या याने आधी गोलंदाजीत चमकदार कामगिरी केली, त्यानंतर फलंदाजीत मोलाचे योगदान दिले.

लखनौचा हा दुसरा विजय होय. तर हैदराबादला सलग दुसऱ्या पराभवाचा सामना करावा लागला. एडन मार्करमचे नेतृत्वही हैदराबादला विजय मिळवून देऊ शकले नाही. हैदराबाद, दिल्ली आणि मुंबईला अद्याप एकही विजय मिळवता आलेला नाही. हैदराबाद विरोधात कृणाल पांड्या याने अष्टपैलू कामगिरी केली. गोलंदाजी करताना कृणाल पांड्याने चार षटकात फक्त १८ धावा खर्च करत तीन गड्यांना तंबूचा रस्ता दाखवला. तर फलंदाजीत त्याने ३४ धावांचे योगदान दिले. कृणाल पांड्याने २३ चेंडूत एक षटकार आणि चार चौकारांच्या मदतीने ३४ धावांचे योगदान दिले.

### तिसरा डोळा
– प्रकाश पोरे



एकदा ‘शिक्का’ बसला
की बसला !!!

| कल्याण |
|---|
| 390-26-150 |

| मेन बाजार |
|---|
| 144-90-668 |



# अन्नसुरक्षेची चिंता...

अन्न आणि पाणी मनुष्याच्या दैनंदिन जीवनातील महत्त्वाची गरज.वस्त्र आणि निवारा कुठे जात नाही.पण अन्न व पाणी कोठून मिळणार.निसर्गाची कृपा झाली तरच ते मिळू शकेल अन्यथा नाही. सतत निसर्गाची अवकृपा होत होत राहिली तर अन्न व पाणी उपलब्ध होणार कोठून? वरून ब्रह्मदेव खाली आला तरी काही इलाज नसतो तेव्हा सरकार तरी काय करणार? अन्नधान्य पिकले पाहिजे व पिकवलेले धान्य टिकले पाहिजे आणि गोरगरिबांच्या मुखात गेले पाहिजे या उदात्त हेतूने केंद्र सरकारकडून अन्न सुरक्षा कायदा आणला गेला परंतु पावसाच्या अनियमिततेमुळे त्याच्यावर विपरीत परिणाम होण्याची भीती शेती क्षेत्रातील जाणकारांकडून व्यक्त होऊ लागली आहे.शेतकरी काबाडकष्ट करून धान्य पिकवतो मात्र अवकाळी,अतिवृष्टी आणि पूर यामुळे उगवलेल्या पिकांची हानी होते आहे.त्याचे परिणाम आता जाणवू लागले आहेत. गहू,तांदूळ,ज्वारी या धान्यांच्या उत्पादनात घट होत असल्याचे विदारक चित्र समोर येत आहे.देशाची लोकसंख्या बेसुमार वाढत आहे.या लोकसंख्येच्या मानाने अन्न-धान्य नाही पिकले तर भविष्यात देशाची मोठी उपासमार होऊ शकते,अशी चिंताही व्यक्त केली जातेय. फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात उष्णतेची लाट आणि प्रमुख गहू उत्पादक राज्यांमध्ये मार्च महिन्यात अवकाळी पाऊस, गारपीट यांमुळे गहू पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. त्याने देशाच्या अन्नसुरक्षेवर परिणाम होऊ शकतो. अवकाळी पाऊस, गारपीट आणि वादळी वाऱ्यामुळे राजस्थान, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेशात गहू पिकाचे सुमारे साडेपाच लाख हेक्टरवर नुकसान झाले आहे, अशी माहिती केंद्रीय कृषी सचिव मनोज आहुजा यांनी दिलीय. पंजाब, हरियाणा, उत्तराखंडमध्ये नुकसान झालेल्या क्षेत्राचा नेमका आकडा स्पष्ट झालेला नाही. सरकारकडून पाहणी सुरू आहे. ऐन काढणीला आलेले पीक भिजले. वादळी वाऱ्यामुळे पीक आडवे पडून पिकाची प्रत खालावली. नुकसानग्रस्त भागांतील उत्पादनात ३० टक्क्यांपर्यंत घट होण्याची शक्यता आहे. मध्य प्रदेशात गव्हाची शेती सुमारे ९५ लाख हेक्टरवर असून त्यापैकी सुमारे एक लाख हेक्टरवर पिकाला अवकाळीचा फटका बसला आहे. राजस्थानात सुमारे



२९.६५ लाख हेक्टरवरील गव्हापैकी सुमारे ३.८८ लाख हेक्टरवरील पिकाचे नुकसान झाले आहे. उत्तर प्रदेशात ३५ हजार हेक्टरवरील गहू पिकाला अवकाळीचा फटका बसला. सर्वाधिक नुकसान आग्रा ते वाराणसी या जिल्ह्यात झाले आहे. उत्तर प्रदेश सरकारच्या मदत विभागाचे आयुक्त प्रभू एन. सिंह म्हणाले, राज्यातील १.२५ लाख गहू उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. अवकाळीमुळे गहू काळा पडणे, गव्हाच्या दाण्याचा आकार कमी राहणे, वजनात घट होणे आदी प्रकार समोर येऊ लागले आहेत. पंजाबमध्ये प्रति एकर गहू उत्पादन सरासरी २० क्विंटल आहे. यंदा त्यात घट होऊन प्रति एकर उत्पादन जेमतेम दहा-अकरा क्विंटलवर येऊ शकते. मध्य प्रदेशात पाऊस झालेल्या ठिकाणी बुरशी वाढू लागली आहे. जी पिके कापणीला आली होती, ती भिजल्यामुळे कापणी करता येत नाही. जी पिके अद्याप हिरवी होती, त्यांचा कापणी करण्याचा कालावधी वाढणार आहेच. शिवाय उभी पिके वादळी वाऱ्यामुळे आडवी झाल्यामुळे गव्हाचा दर्जाही खालावणार आहे. देशात यंदा सुमारे ३४ लाख हेक्टरवर गहू लागवड झाली होती. केंद्र सरकारने यंदा देशात विक्रमी ११२,२ दशलक्ष टन गहू उत्पादनाचा अंदाज व्यक्त केला होता. तांदळानंतर गहू देशातील प्रमुख शेतीमाल आहे. देशातील मोठ्या लोकसंख्येचे ते अन्न आहे. युक्रेन-रशिया युद्ध, खनिज तेलाचे वाढते दर, जगभरातील वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर देशात उच्चांकी गहू उत्पादन होणे अपेक्षित होते. केंद्र सरकारने तसे जाहीर केले असताना, गहू उत्पादनात ३० टक्क्यांपर्यंतची घट देशाची अन्नसुरक्षा अडचणीत आणणारी आहे. मध्य प्रदेशात हमीभावाने खरेदी सुरू होऊनही स्थानिक व्यापारी गव्हाचा दर्जा खालाविल्याचे कारण सांगून हमीभावापेक्षाही कमी भावाने गहू खरेदी करत आहेत. सरकारने व्यापाऱ्यांनी हमीभावापेक्षा कमी दराने गहू खरेदी करू नये, असे आदेश दिले आहेत. पण, गव्हात बाष्पाचे प्रमाण जास्त असल्याचे सांगून शेतकऱ्यांकडून कमी दराने गहू खरेदी करण्यास हरकत नसल्याच्या पत्रावर सही घेण्यास सुरुवात केली आहे. अशीच स्थिती अन्य राज्यांत निर्माण होण्याची शक्यता आहे.अन्न पिकवावे लागणार आहे.हिम्मत सोडून चालणार नाही.पावसाचा अंदाज पाहून शेतीकडे लक्ष देण्याची गरज आहे.शेती व्यवसाय सोडून चालेल कसे?

## आध्यात्मिक

# महाराष्ट्राची कीर्तन परंपरा

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासामध्ये कीर्तन परंपरेचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. किंबहुना कीर्तन संस्था ही महाराष्ट्राचीच नव्हे तर एकुणातच तमाम भारतीयांच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक जीवनाचे भरणपोषण करणारे महत्त्वाचे केंद्र आहे. या परंपरेचा उगम थेट प्राचीन पुराणग्रंथात तसेच वैदिक काळातही सापडतो. यावरून या माध्यमाची प्राचीनता व मौलिकता स्पष्ट होते. 'कीर्तन' या शब्दाचे अनेक अर्थ दिसून येतात. स्तवन करणे, स्तुतीस्तोत्र गाणे, गुण वर्णिने किंवा कथीने, हरिदास वगैरे वीणादी गाणसाहित्य घेऊन देवळात परमेश्वराचे उभ्याने गुणवर्णन करतात ते.

celebrating the praises of a God with music and singing.

इत्यादी अर्थ अग्निपुराण, भारतीय संस्कृती कोश आणि मोल्सवर्थ शब्दकोशात दिलेले आहेत. महर्षी नारदांना या संस्थेचे जनक मानले जाते. त्यामुळेच या व्यासपीठाला नारदाची गादी म्हणण्याचाही प्रघात आहे. वारकरी पंथात कीर्तनाच्या प्रवर्तकाचा मान संत नामदेवांना दिला जातो. नारदीय कीर्तन, वारकरी कीर्तन, रामदासी कीर्तन आणि लोकमान्यांनी सुरू केलेला राष्ट्रीय कीर्तन हा नवा प्रवाह असे कीर्तनाचे विविध प्रकारही पडतात. रंजन व प्रबोधनाचे अत्यंत सुलभ व प्रभावी साधन म्हणजे कीर्तन होय. कीर्तन ही दृकश्राव्य कला आहे.

**गाडगेबाबांनी या शैलीतून समाज प्रबोधन साधले, पण जेव्हा कीर्तनाच्या व्यासपीठावरून चित्रपट गीतांच्या चाली लावून अभंग गायिले जातात, तेव्हा मात्र खूप वेदना होतात. काहीही झाले तरी 'भक्तीचा इव्हेंट' होऊ देता कामा नये. सवंग लोकप्रियतेच्या मागे लागून रंजनासाठी लोकाभिरुचीचा अनुनय केला जाऊ नये. या भक्तीचे पावित्र्य जपणे, ते अबाधित ठेवण्याची जबाबदारी प्रत्येक मराठी माणसाची आहे. काळ कितीही बदलेल पण अजून तरी कीर्तनाचे तिकीट काढावे लागत नाही ही का`णाची पुण्याई आहे? मराठी संतांचीच ना? शेवटी नामदेवांच्याच शब्दांत सांगावेसे वाटते, 'नामा म्हणे फार सोपे हे साधन। वाचे नाम घेणे इतुकेची।' कीर्तन परंपरेची ही सहजता आणि सुलभता आपण जोपासायला हवी.**

मौखिक परंपरेने चालत आलेली प्रयोगरूप कला म्हणून कीर्तन या प्रकाराकडे पाहिले जाते. नवविधा भक्तीतील भक्तीचा दुसरा प्रकार म्हणूनही कीर्तनाची ओळख आहे. हे पारमार्थिक अधिष्ठान या कला प्रकाराला लाभल्याने कीर्तनाकडे केवळ भक्तिभावाने पाहिले गेले. त्यामुळे या कलेच्या प्रायोगिक व कलात्मक अंगाकडे दुर्लक्ष झालेले दिसते. कीर्तन हा जसा सामूहिक भक्तीचा एक प्रकार आहे तसाच ती सादरीकरण होणारी नाट्यासारखी प्रायोगिक कला आहे. संगीत, नाट्य नृत्य, साहित्य, वक्तृत्व या कलेचा समन्वय कीर्तनात होतो. तसेच नाटकाप्रमाणे ही कला समूहासमोर प्रत्यक्ष सदर होत असल्याने ही कला अधिक समूहिष्ठ समजली जाते. या संस्थेचे आणखी वैशिष्ट्ये म्हणजे ज्या काळात कोणत्याही प्रकारचे शिक्षण आणि मुद्रण कलेची सुविधा उपलब्ध नव्हती, त्या काळात लोकशिक्षणाचे व साहित्याच्या प्रसार, प्रचाराचे आणि समाजप्रबोधनाचे, प्रभावी असे कार्य कीर्तन या संस्थेने केले. या दृष्टीने विचार करता कीर्तन ही परंपरा एकाच वेळी पारमार्थिक, रंजनात्मक, प्रबोधनात्मक आणि प्रकाशनात्मक, प्रसारात्मक असे पंचविध कार्य करते. या माध्यमाचे हे अनेकविध पैलू आहेत.



कीर्तनाच्या या बहुविध स्वरूपामुळेच ही कला मराठी साहित्यातील संत, पंत आणि तंत या तिन्ही प्रवाहामध्ये महत्त्वाची मानली गेली. एवढेच नव्हे तर अनेक पंडित व शाहीर कवी हे उत्तम कीर्तनकार होते. कीर्तनाच्या माध्यमातूनच काव्य, शास्त्र व विनोदाचा विशेषत: संत, पंत, तंत साहित्याचा प्रसार व प्रचार झाला. मनोरंजनासह जीवनमूल्यांचा प्रसार करणारे कीर्तनासारखे दुसरे प्रभावी, लोकप्रिय आणि आदर्श माध्यम नाही. पौराणिकतेपासून राष्ट्रीयत्वापर्यंतचा पैस कीर्तन संस्थेने व्यापलेला दिसून येतो. कीर्तनाच्या या कलात्मक आणि समाजाभिमुखतेमुळेच अनेक सुधारक संतांनी कीर्तनाच्या माध्यमातून जनजागृतीचे आणि आत्मजागृतीचे कार्य केले.

**नाचू कीर्तनाच्या रंगी। ज्ञानदीप लावू जागी।**

अशी प्रतिज्ञा करून संत नामदेवांनी आत्मजागृतीचे, भागवत धर्माचे प्रसाराचे कार्य केले, तर संत गाडगेबाबांनी या कीर्तनाला संवादात्मक रूप देऊन समाज जागृतीचे कार्य केले. यावरून ह्या कलेचे माहात्म्य लक्षात येते. अनेक थोर विचारवंतांनी कीर्तन परंपरेचा मुक्तकंठाने गौरव केला आहे. यासंदर्भात लोकमान्य टिळकांनी म्हटले आहे, मी पत्रकार झालो नसतो तर कीर्तनकार झालो असतो.' तर सावरकर म्हणतात, कीर्तन संस्था ही सत्प्रचाराचे अप्रतिम साधन असून गायन, वादन, वक्तृत्व, विनोद, गांभीर्य आणि हृदयस्पर्शी आपुलकी इत्यादींचा मिलाफ असल्याने असा संयोग कीर्तनाव्यतिरिक्त आढळत नाही.'

अशा प्रकारे कीर्तन ही कला समाज जीवनामध्ये अत्यंत लोकप्रिय आहे. एकाच वेळी हजारो लोकांसमोर साक्षात होणारे हे माध्यम असल्याने विविध भक्तिपंथांनी आपल्या विचाराचे व पंथीय तत्त्वज्ञानाचे प्रसारण याद्वारे केले. विशेषत: नाम भक्तीच्या व स्मरण भक्तीच्या प्रचारासाठी कीर्तनाचे खूपच प्रभावी उपयोजन झालेले दिसून येते. आजच्या आधुनिक काळातही या माध्यमाची लोकप्रियता तसूभरही कमी झालेली दिसत नाही. कीर्तनाच्या या लोकप्रियतेचे गमक तत्कालीन लोकमानसातील कलाविषयक दृष्टिकोनात दडलेले दिसते. त्याकाळी कोणत्याही कलेला मोठ्या प्रमाणात समाजमान्यता नव्हती. नृत्य, नाट्य, गाणे, बजावणे हे शिष्टसंमत समजले जात नसे. कलावंताकडेही निकोप दृष्टीने पाहिले जात नसे. अशा कलाविषयक उदासीनतेच्या काळात मानवी मनाची रंजन भूक कीर्तनाच्या माध्यमातून तृप्त झाली.

कीर्तनात अनुस्यूत असलेल्या भक्तिभावामुळे लहान, थोर, स्त्री-पुरुष व सर्व वर्गामध्ये कीर्तन प्रसिद्ध झाले. नाट्यानुभूतीचा आनंद कीर्तनाच्या माध्यमातूनच लोकांना प्राप्त झाला यात कसलाही संशय नाही. जोपर्यंत दूरदर्शन आणि तत्सम मनोरंजनाची साधने ग्रामीण भागात उपलब्ध नव्हती तेव्हा साहित्य, कलेच्या आस्वादाची गरज लोकनाट्य आणि कीर्तन या दोन लोकमाध्यमांनी परिपूर्ण केली. या मूलभूत गुणधर्मामुळेच कीर्तन ही एक प्रभावी अशी लोकप्रकटन संस्था ठरते. कीर्तन या माध्यमाचे हे सामर्थ्य ओळखूनच मराठी संतांनी कीर्तनाद्वारे भक्तीचा प्रसार केला. वारकरी पंथात तेराव्या शतकात सुरू झालेला हा कीर्तनानंद अखंडपणे महाराष्ट्रभर वीणेच्या झंकाराने आणि रामकृष्ण हरीच्या गजराने निनादत आहे. यात कोणताही खंड पडला नाही. भक्ती आणि काव्याच्या प्रसारासाठी कीर्तनासारखे सशक्त साधन इतर कोणत्याही राष्ट्रामध्ये सापडणार नाही. भक्ती आणि ज्ञानाचा सुरेख संगम कीर्तनातून प्रतीत होतो.

**'सततं कीर्तयँतो मा'** या उक्तीप्रमाणे कीर्तन ही उपासना भक्ती असली तरी समाजप्रबोधनाचे, समाजजागृतीचे महत्त्वाचे परिमाण या भक्ती प्रकाराला लाभलेले असल्याने सामाजिक दृष्टीनेही या प्रकाराचा विचार करणे गरजेचे आहे.

संत ज्ञानदेवांपासून कीर्तनाचा जागर महाराष्ट्रात सुरू झाला. 'मद्भक्ता यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि नारद' या वचनाला अनुसरून सर्व संतांनी कीर्तन भक्तीचा मार्ग अवलंबला. या प्रेरणेतूनच नामसंकीर्तन साधन पै सोपे, असे म्हणत वारकरी पंथानेही या माध्यमाचा नामभक्तीचा परिपूर्ण वापर केला. तत्कालीन समाजातील कर्मकांडाला फाटा देऊन भक्तीचे सुलभीकरण केले. संत नामदेवांनी तर कीर्तनालाच आपले जीवितकार्य मानले. त्यांच्या अनेक अभंगांतून याची प्रचिती येते. नामा वाळवंटी कीर्तन करी, हे जनाबाईने नामदेवांसंबंधी काढलेले उद्गार नामदेवांच्या कीर्तन प्रेमाची साक्ष आहे. नामदेवांनी रचिलेल्या या कीर्तनरूपी इमारतीचा कळस चढवला तो संत तुकोबांनी! तुकारामांच्या अभंगांतूनही कीर्तनाबद्दलची आस्था त्यांच्या अनेक अभंगांतून आविष्कृत झाली.

**- डॉ. अशोक लिंबेकर.**

## टुडेज् ब्लॉग

# माणसाचे सहावे इंद्रिय मोबाईल

**आज मोबाईल माणसांच्या खिशात नाही, मोबाईलच्या खिशात माणसं असतात. मोबाईलच्या चौकटीत जगणाऱ्या माणसांनी आज मोबाईल हे सहावे इंद्रिय म्हणून घोषित करावे. अगदी ३० वर्षांपूर्वी प्रतिष्ठेचं लक्षण असलेला मोबाईल आज हातागणीक झालेला आहे. अनेकदा एकच व्यक्ती दोन किंवा तीन मोबाईलची मालक असणंही सहजमान्य झालेलं आहे. व्हिडिओ फोटो फिचर्स असलेला मोबाईल वेगळा आणि सोशल मीडियासाठी वेगवेगळा मोबाईल वापरणारेही आहेतच. इन्स्टा, फेसबुक, व्हॉट्सॲपनं माणसांचं जगणं केव्हाच गिळून टाकलंय. लोकल ट्रेनमध्ये वर्तमानपत्रं, मासिकं वाचण्याचा काळ संपूनही काळ लोटून गेलाय. आता सिनेमा चित्रपटगृहात पाहिला जात नाही, ओटीटीमुळे ही सोय मोबाईलमध्येच झाल्यावर आणि ५जी, ६जीच्या जमान्यात मोबाईल मानवी देहाचाच भाग झालेला आहे. मोबाईलचे जनक मार्टिन कूपर यांनीही मोबाईलला व्यसन होऊ देऊ नका, असा सल्ला दिला आहे, पण लक्ष कोण देतो अशीच सध्या अवस्था आहे.**

इंटरनेट पेमेंट केल्यावर बँकेतली शिल्लक पाहण्यापुरते एसएमएस उरले आहेत. 'कमरेला पेजर आणि गावाला चक्कर' नव्वदच्या दशकाच्या अखेरीस पेजरधारी मानवाकृती एखाद्या म्यानातून तलवार उपसावी अशा आवेशात प्लास्टिकच्या कमरेला लटकवलेल्या चौकोनी कॅबिनेटमधून रिंग वाजवणारा पेजर बाहेर काढीत. पेजरला सोन्या-चांदीची चैन लावणं ही काही पेजरधाऱ्यांसाठी चैनच होती. मोबिलिंक किंवा ईझीकॉलच्या पेजरवरचा नंबर पाहून एमटीएनएलचे लाल डबे शोधत आलेल्या नंबरवर फोन करणं हे सामाजिक प्रतिष्ठेचं लक्षण होतं, तर मोटोरोला, नोकियानं वॉकीटॉकीसदृश्य मोबाईल आणून पेजरयुग संपवलं. मॉट्स, ऑरेंजचा काळही दोन दशकांपूर्वीचा. 'तीन रुपयात चाय कटिंग आणि दोन रुपयात एक फोन कॉल' अशा जाहिरातींनी मुंबईच्या स्टेशनातल्या जागा हेरलेल्या होत्या.

उत्क्रांतीवादात माकडाचा माणूस होत गेला. आता त्यापुढं माणूस झालेल्या माणसाचा मोबाईल होतोय. सिक्थ सेन्सनंतर हे सहावे इंद्रिय माणसाच्या आज खिशात असतंय. त्यामुळे एकच डोईजड झालं असताना अशीच आणखी दोन-तीन मोबाईलरूपी इंद्रियं बाळगणाऱ्यांचं कौतुकच व्हावं. मोबाईलच्या दुष्परिणामांची चर्चा जगभर सुरू असताना मोबाईलचा शोध लावणाऱ्या मार्टिन कूपर यांनी मोबाईलच्या वाढत्या व्यसनामुळे चिंता व्यक्त केलीय. मोबाईलचा वापर गरजेइतकाच करण्याचं त्यांनी सुचवलंय. मग गरज कोणती व्हिडिओ पाहण्याची, करण्याची, चॅटिंगची, सिनेमे पाहण्याची, संवाद साधण्याची, सोशल मीडियावर ॲक्टिव्ह राहण्याची अशी सगळीच आहे. या गरजांनी सगळं जगणंच व्यापून टाकलंय. आज चार मित्र-मैत्रिणी प्रत्यक्ष दुर्मीळ होऊन भेटले तरी ते चौघे इतर चार जणांशी आणि बाहेरच्या जगाशी आपापल्या मोबाईलरूपी चौकटीतून आपापले बाहेरच्यांशी संवाद साधत असतात.




लोकल ट्रेनच्या प्रवासात ऑफिसातनं एकत्र सुटलेले मित्र, सहकारी आपसात बोलत नसतात, तेसुद्धा इतरांशी आपल्या चौकटीतून संवाद साधतात. हे बोलणं आपलं आपल्याशी नसतंय, ते आपल्यातल्या लोकांशीही नसतं, ते बाहेरच्यांशी असतं. व्हर्च्युअल जगातल्या लोकांनी परस्परांशी बोलावं, आपापली गाऱ्हाणी मांडावीत, सुख-दुःखं सोशल मीडियाच्या चव्हाट्यावर मांडावीत, या वेदना-संवेदनांना लाईक्स मिळावेत, मिळवावेत, अगदी आत्महत्येचा विचारही सोशल मीडियावर मांडून मग त्याची प्रत्यक्ष लाईव्ह अंमलबजावणी करण्याच्या घटनांनी आणि मग तो व्हिडिओ चालवणारे, व्हायरल करणारे, त्यावर मतमतांतरे देणारे, रडके, चिंताग्रस्त इमोजी टाकणाऱ्यांसाठीही त्यांचं व्हर्च्युअल सांत्वन एका क्लिकपुरतंच. एखाद्याच्या मृत्यूचा फोटोसोहळा इथंही क्लिक केलं, 'आरआयपी'ची अक्षरं डकवली की पुढे जाता येतं. पुढच्याला 'हॅप्पी बर्थडे' करताना अभिनंदन करताना फोटोला लाईक मारून वाह, क्या बात है, भारीच, बढीया असली अक्षरं डकवून इमोजी बदलणारं 'फास्टफूड' संवेदनांनी भरलेलं जग झाकलेल्या मोबाईलच्या मुठीत संपूर्ण सामावून गेलंय. आनंदाचा चित्कार करणारे, खो-खो हसणारे, व्हॉट्सॲपवरच वाढदिवसाचा केक पाठवणारे मोबाईल मित्र मंडळ मोठं होत जातं. मोबाईलमुळे माणसांमधला 'मी' वाढीस लागल्यानं 'आम्ही' मागे पडत आहोत.

**- संजय सोनवणे.**

## जन्म हा अखेरचा

# कायानुग्रहस्थल - २



**'स्वपरज्ञप्तिशून्यत्वं जडत्वम् ।'** ज्याला स्वत:चे आणि इतरांचे ज्ञान नसते ते जड होय.

तुम्ही आता फरशीवर म्हणजे दगडावर बसलेले आहात. आपल्यावर कोण बसलेले आहे याचे ज्ञान त्या दगडाला नाही. तुम्ही माझ्या अंगावर बसलात म्हणून माझे अंग दुखले, अशी तक्रार कोणत्या दगडाने आतापर्यंत केली आहे काय? दगड जर असे बोलू लागला तर दगडाला तुम्ही घरात ठेवणार नाही, बाहेर फेकून द्याल. शिळा, धातू, लाकूड हे जड पदार्थ होत. परंतु त्यांच्यापासून जेव्हा मूर्ती तयार केली जाते आणि त्या मूर्तीत ईश्वराचा प्रवेश होतो तेव्हा त्या वस्तूचे जडत्व ईश्वराला स्पर्श करीत नाही. जडात राहूनदेखील भगवंताला जडत्व येत नाही. त्याप्रमाणे शरीरात राहणारा योगी शरीराच्या गुणदोषांपासून अलिप्त असतो. जो शरीराचा अभिमान धरतो, त्याला शरीराचा संगदोष लागतो. परंतु ज्याच्या मनात शरीराभिमान नसतो, त्याला शरीराचे गुणदोष चिकटत नाहीत. शरीराला दु:ख झाला की आपण दु:खी होतो. शरीराला सुख झाले की आपण सुखी होतो; याचे कारण काय? तर शारीरिक विकारांमध्ये आपण अभिमान धरतो, हे होय. शरीर विकारी आणि मलिन असते. त्याला कितीही वेळा धुतले तरी ते पुन्हा पुन्हा मळत राहते. अशा शरीरात आत्मरुपाने जो परमात्मा नांदतो तो मात्र मलापासून मुक्त असतो. कारण परमात्मा अलिप्त असतो, आकाशाप्रमाणे. आकाश पाण्याने भिजत नाही. अग्नीत जळत नाही. तुमचे घर आगीत भस्मसात होतो, परंतु घरातले आकाश मात्र जळून जात नाही. उन्हाळ्यात तुमच्या घराच्या भिंती तापतात, घरातल्या वस्तू आणि तुमचे शरीर देखील तापते. परंतु घरातले आकाश मात्र तापत नाही. कारण आकाश अलिप्त असते. परमात्म्याचे स्वरुप समजावून सांगताना आकाशाची उपमा दिली जाते. आकाश सर्वत्र असते आणि अधिकारी असते तसाच परमात्मा असतो. **(क्रमश:) - काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

## जनमानस

# प्लॅस्टिकमुक्तीसाठी एक हटके योजना

दक्षिण काश्मिरमधील अनंतनाग जिल्ह्यातील सदिवारा गावातील सरपंचांनी आपले गाव प्लॅस्टिकमुक्त करण्याचे पूर्वीपासून बरेच प्रयत्न केले होते, परंतु त्यात त्यास यश आले नाही. त्यांनी प्लॅस्टिकमुक्तीसाठी नव्याने प्रयत्न केले ते 'प्लॅस्टिक दो, सोना लो' अशी अभिनव घोषणा करून.



या योजनेअंतर्गत २० क्विंटल प्लॅस्टिक कचरा देणाऱ्याला ग्रामपंचायतीकडून सोन्याचे नाणे भेट देण्याचे ठरले. ही अनोखी घोषणा जाहीर होताच संपूर्ण सदिवारा गाव पंधरा दिवसात स्वच्छ होऊन प्लॅस्टिक मुक्त झाल्याची घोषणा करण्यात आली. यावरून लक्षात येते की समाजमनाला जागृत करण्यासाठी घोषणांच्या साथीने काही आकर्षण पुढे केले गेल्यास सर्वांचा उस्फूर्त सहभाग वाढतो. परिणामी इप्सित साध्य होते. लोकांना घोषणांमागचे मूळ उद्देश समजून आल्यावर ती जबाबदारीने समाजकार्यात सहभागी होतात. या गावातील योजनांचे अनुकरण करण्यास शेजारील गावांनी देखील सुरुवात केली आहे. देशभर यासारख्या योजनेचे लोण पसरले गेल्यास फक्त प्लॅस्टिक कचरा नव्हे तर इतर कचरा जमा केला जाईल त्याची रितसर विल्हेवाट लावता येईल अन् गांवे कचरामुक्त म्हणजेच स्वच्छ होऊ शकतील. परिसर प्रदूषणमुक्त होतील. लोकांचे आरोग्य सुधारण्यास मदत होईल.

**- स्नेहा राज, गोरेगाव.**

## मुलांना पुस्तक वाचनाची गोडी लावावी

सद्यस्थितीत मोबाइल व टीव्हीच्या प्रभावाखाली असणाऱ्या मुलांना पुस्तक वाचनाची गोडी लावण्यासाठी प्रयत्न आवश्यक आहेत. तंत्रज्ञानाच्या युगात कालसुसंगत लिखाण गरजेचे असून बालसाहित्यिकावर मोठी जबाबदारी आहे.

**- प्रफुल्लचंद्र काळे, नाशिक.**

# असंसर्गजन्य आजारांचे वाढते आव्हान चिंताजनक

तंबाखूचे वाढते प्रमाण, दारूचे व्यसन, रोजच्या आहारात फळे आणि भाज्यांचा अभाव, आहारात मिठाचा अतिवापर, चुकीची जीवनशैली आणि शारीरिक कसरतींचा अभाव अशा कारणांमुळे मधुमेह व उच्च रक्तदाबासारख्या आजारांचे प्रमाण जगभरात वाढत आहे. राज्यातही मधुमेह आणि उच्च रक्तदाबाची परिस्थिती बिकट आहे. राज्य सरकारच्या आरोग्य विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार २०१८ ते ३ एप्रिल २०२३ पर्यंत उच्च रक्तदाबासाठी एक कोटी ८८ लाख २१ हजार ४६७ नागरिकांची चाचणी करण्यात आली. त्यांपैकी १९ लाख ५९ हजार ४२९ नागरिकांना निदान झाले आहे. राज्यात रक्तदाबाच्या १९ लाख ३८ हजार ४५७ रुग्णांवर उपचार सुरू आहेत. त्याच कालावधीत एक कोटी ८७ लाख ३८ हजार १४१ नागरिकांची मधुमेह चाचणी झाली आहे. त्यांपैकी नऊ लाख ३२ हजार १५३ नागरिकांचे निदान झाले असून आठ लाख ५० हजार ६१४ रुग्णांना मधुमेहाच्या उपचारांची गरज भासली आहे.

**भारतातील बहुतांश लोकसंख्या श्वसनासंबंधीच्या आजाराने आणि फुफ्फुसाच्या आजाराने त्रस्त आहे. यामुळे भारत जगातील सर्वाधिक आजारांचे ओझे वाहून नेणारा देश आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. जर आपण या आजारांवर नियंत्रण आणू शकलो नाही तर आपल्या देशाची ओळख आजारांचा देश म्हणून होत राहील.**

असंसर्गजन्य आजारामुळे जगातल्या एकूण ८ अब्ज लोकसंख्येपैकी जगभरात दरवर्षी होणाऱ्या मृत्यूंपैकी १८ टक्के मृत्यू १.३ अब्ज लोकसंख्या असलेल्या आपल्या देशात होत आहेत. संयुक्त राष्ट्राच्या जागतिक आरोग्य अहवालामध्येही असाच उल्लेख करण्यात आला आहे.

असंसर्गजन्य आजारांमुळे (हृदयरोग, मधुमेह आणि कॅन्सर) येणाऱ्या काही वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेवर फार मोठा परिणाम होणार असल्याचे सांगण्यात आले आहे. या अहवालात सांगण्यात आले आहे की,२०१२ ते २०३० या कालावधीत या आजारांच्या उपचारांवर जवळपास ३१ लाख कोटी रुपये खर्च होईल. हा अहवाल शहरी लोकसंख्येच्या विकासावर पडलेल्या परिणामावर आधारित आहे. देशात दरवर्षी होणाऱ्या एकूण मृत्यूंपैकी सहा मृत्यू कॅन्सरने होत आहेत. जागतिक स्तरावर हाच आकडा आठ टक्के आहे. अशाच प्रकारे भारतात सहा कोटींपेक्षा अधिक मधुमेहाचे रुग्ण आहेत.

जानेवारी २०१५ मध्ये जागतिक आरोग्य संघटनेने



(डब्ल्यूटीओ) ने खुलासा केला होता की, जगात असंसर्गजन्य आजाराने मृत्यू पावणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.

जगात दरवर्षी दीड कोटी कॅन्सर, मधुमेह आणि हार्ट अटॅकसारख्या गैरसंक्रमण आजाराने माणसे मरत आहेत. जर अशा आजाराने ग्रस्त लोकांना वेळेत उपचार मिळाल्यास त्यांचा जीव वाचू शकतात.

मुळात आपल्या गावपातळीवरील आरोग्य सेवा पुरती खिळखिळी झाली आहे. आरोग्य, भौतिक सुविधा नाहीत. औषधांचा पुरवठा होत नाही. वैद्यकीय अधिकारी आणि इतर कर्मचारी यांची वर्षो वर्षे भरती करण्यात आली नाही. त्यामुळे स्थानिक परिसरात उपचार वेळेवर मिळत नाहीत. त्यामुळे लोकांना महागड्या, शहरातल्या दवाखान्यात उपचार घ्यावे लागतात किंवा उपचाराभावी कुडत मरावे लागते. असंसर्गजन्य आजारांवर नियंत्रण आणण्यासाठी ठोस उपाययोजनांची गरज आहे. शासनाबरोबरच मोठमोठी देवस्थाने, सामाजिक संस्था यांनीही यासाठी पुढाकार घ्यायला हवा. त्याचबरोबर लोकांनीही आपल्या आरोग्याची काळजी घेण्याबाबत दक्ष राहिले पाहिजे. वजन आणि रक्तदाब कमी करण्यासाठी आहारासोबत योगाभ्यास आवश्यक आहे. उच्च रक्तदाब व्यायाम आणि योगासनांनी कमी करता येतो. चालणे, पोहणे, सायकल चालवणे आणि धावणे असे व्यायाम प्रकार फायदेशीर आहेत.

**- मच्छिंद्र ऐनापुरे, जत, जि. सांगली.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# विकासरत्न : सिध्दाराम म्हेत्रे



अक्कलकोट तालुक्याचे पाणीदार नेतृत्व असलेल्या विकासरत्न माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांचा आज(शनिवार दि.८एप्रिल) बासष्टावा वाढदिवस. काळ कोणासाठी थांबत नाही. धकाधकीच्या जीवनात म्हेत्रे साहेबांनी कधी बासष्टाव्या वर्षात पदार्पण केले, हे कळाले पण नाही.त्यांनी बालपणापासूनच आपल्या जीवनात संघर्षाला सुरवात केली. हा संघर्ष त्यांना त्यांच्या राजकीय जीवनात सुध्दा वाट्याला आला. दुधनीचे सलग पन्नास वर्षे नगराध्यक्षपद भषवलेले स्व. सातलिंगप्पा म्हेत्रे यांचे ते सुपुत्र. बालपणापासून घरात राजकारण असल्याने पदवी संपादन केल्यानंतर त्यांनी राजकारणात प्रवेश केला.त्यांच्या राजकारणाची सुरवात समाजकारणातून झाली. प्रथम तालुक्यातील आपल्या विचारांची युवकांची फळी तयार करून तालुका ' लोकसेवा युवक आघाडीची ' स्थापना केली व समाजकारण सुरू केले. तसेच समाजकारण आज त्यांची कन्या रणरागिणी शितलताई म्हेत्रे या करीत आहेत.

सिध्दाराम म्हेत्रे यांनी युवक काँग्रेसचे अध्यक्षपद स्विकारले व राजकीय पदार्पणातच तोळणूर जिल्हा परिषद मतदार संघात स्व.सुरेश पाटील यांच्या सारख्या मातब्बर नेत्याचा पराभव करून विजय संपादन केला. यानंतर त्यांनी मागे वळून पाहिलेच नाही. त्यानंतर पंचायत समिती सदस्य होऊन ते सभापती पदावर विराजमान झाले. त्यावेळी भाजपाचे तत्कालीन आ. बाबासाहेब तानवडे यांचे अपघाती निधन झाल्याने विधानसभेची पोटनिवडणूक झाली. त्यावेळी सिध्दाराम म्हेत्रे तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष होते. यावेळी अनेक इच्छुक मातब्बरांना डावलून श्रीमती सोनियाजी गांधी यांनी पक्ष संघटनेचे काम करणारे सिध्दाराम म्हेत्रे यांच्या सारख्या नवख्या व तरुण उमेदवारास संधी दिली. यामध्ये देशाचे नेते सुशीलकुमार शिंदे, शरदचंद्र पवार व छगन भुजबळ यांचा सिंहाचा वाटा होता. पोटनिवडणुकीत विजय मिळाल्यानंतर त्यांनी तालुक्यातील ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात नळ पाणीपुरवठा योजनेचे काम केले. याचा फायदा होऊन पुढील दोन विधानसभा त्यांनी जिंकल्या यावेळी तालुक्यातील जनतेची विकासकामे केली. प्रत्येक गाव डांबरीकरणाने जोडला. यामुळे ग्रामीण भागात दळणावळणाची सोय झाली. प्रत्येक गावात विविध समाजासाठी समाजमंदिरे, सांस्कृतिक सभागृहे, धोबीकट्टा, अंगणवाड्या, स्मशानभूमीस संरक्षक भिंती बांधल्या. दुधनी, मैंदर्गी, अक्कलकोट नगरपरिषदेस शासनाकडून विशेष निधी मंजुर करून त्याठिकाणी भव्य इमारती बांधल्या. त्यांचा कामाचा झपाटा पाहून राज्य मंत्रीमंडळात त्यांची वर्णी लागली. त्यांनी गृह, तुरूंग, फलोत्पादन, ग्रामविकास खाती यशस्वीपणे सांभाळली. ग्रामविकास मंत्री असल्याने शासनाकडून निधी उपलब्ध करून मोठ्या वस्तीच्या गावात अंतर्गत रस्ते तयार केले. पंचायत समितीची नविन भव्य इमारत बांधली. अक्कलकोट शहरासाठी कूरनूर धरणातून नवीन नळ पाणीपुरवठा योजना राबवून शहराचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी मिटवला. कूरनूर धरणाचे खरे जनक म्हेत्रे हेच आहेत. कूरनूर धरणाची योजना बंद करण्याचे शासनाकडून प्रयत्न चालले होते. शासन दरबारी पाठपुरावा करून ही योजना पुनश्च सुरू करण्यासाठी म्हेत्रे यांनी शासनास भाग पाडले. त्यामुळे धरण पूर्ण झाले. कूरनूर धरणाच्या परिसरातील बावन्न गावातील शेतीची खरेदी विक्री बंद होती. हे धरण उचल पाणी घेण्याचे असल्याने आठ एकराचा स्लॅब रद्द करावा, शेतकऱ्यांची जमीन परत मिळावी ही भूमिका सिध्दाराम म्हेत्रे यांनी मांडल्याने तत्कालीन मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी आठ एकराचा स्लॅब रद्द केला. यामुळे बाबन्न गावातील शेतकऱ्यांची जमीन त्यांना परत मिळाली व तालुक्यात एक नवी क्रांती झाली. कूरनूर गावाचे प्रथम पुर्नवसन करून नंतर धरण बांधण्यात आले. हे राज्यातील एकमेव उदाहरण आहे. ऊस ऊत्पादकांची दयनीय अवस्था पाहून त्यांच्या मागणी प्रमाणे मातोश्री शुगरची उभारणी करून साखर कारखाना सुरू केला. आज त्यांचे सुपुत्र शिवराज म्हेत्रे काटकसरीने कारखाना चालवत आहेत. सोलापूर - गुलबर्गा हा चौपदरी रस्ता, अक्कलकोट - सलगर, अक्कलकोट - वागदरी, अक्कलकोट - हैद्रा या रस्त्याचे काम करून प्रवास सुखकर केला. घोळसगांव,नागणसूर, दुधनी, करजगी येथे साठवण तलाव व तालुक्यात पाचशे पाझर तलाव करून शेतकऱ्यांची जमीन पाण्याखाली आणली. त्याचप्रमाणे तालुक्यातील वाचन संस्कृती जपण्यासाठी एकशे पंचवीस ग्रंथालयांना आमदार विकास निधीतून लोखंडी कपाटे दिली. शहरातील संस्थानकालीन दीडशे वर्षांपूर्वीचे श्रीमंत शहाजी राजे भोसले वाचनालय बांधण्यासाठी मुख्यमंत्री निधीतून रक्कम उपलब्ध करून दिली. चारवेळा विधानसभा जिंकून त्यांनी नवा इतिहास देखील रचला आहे. राजकारणात दोन वेळा पराभव झाला तरी जनतेची कामे करण्यासाठी ते सदैव तत्पर असतात. तालुका काँग्रेसचे अध्यक्ष शंकर (मालक) म्हेत्रे हे आपल्या भावाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून कार्य करीत आहेत. सिध्दाराम म्हेत्रे यांच्या बासष्टाव्या वाढदिवसा निमित्त त्यांना पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!-

**-रविकांत धनशेट्टी,**
अक्कलकोट,
मो- ९७६५०६३७५३.


































घनकचरा व्यवस्थापनासाठी ३१ कोटींचा निधी मंजूर

# प्रथमच १४०० कर्मचाऱ्यांना ड्रेसकोड, सुरक्षा साहित्याचे वाटप

## शहर स्वच्छतेसाठी विविध उपाययोजना करण्यात येणार

सुराज्य/सोलापूर

**महापालिकेला घनकचरा व्यवस्थापनांतर्गत ३१ कोटी २६ लाख रुपयांचे निधी प्राप्त झाला आहे. यामध्ये शहर स्वच्छतेसाठी विविध उपाययोजना करण्यात येणार आहेत. विशेष म्हणजे घनचकरा व्यवस्थापनांतर्गत काम करणाऱ्या १७०० महिला व पुरुष कर्मचाऱ्यांना महापालिकेच्या इतिहासात प्रथमच ड्रेसकोड आणि साहित्य मिळत आहे. शनिवारी यापैकी १४०० कर्मचाऱ्यांना या साहित्याचे वाटप करण्यात आले. यापूर्वी एकूण कर्मचाऱ्यांपैकी केवळ २५ टक्के कर्मचाऱ्यांना महापालिकेकडून साहित्य देण्यात येत असत. यंदा मात्र सर्वच कर्मचाऱ्यांना एकसारखे कपडे व साहित्य देण्यात येणार आहे.**

केंद्र शासनाकडून घनकचरा व्यवस्थापनांतर्गत सोलापूर महापालिकेला १८ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला होता. त्यापैकी पहिल्या टप्प्यात ५ कोटी रुपये महापालिकेला प्राप्त झाले. त्यातून महापालिकेने सीएनजीवरील ३५ घंटागाड्या खरेदी केल्या. भोगाव कचरा डेपो परिसरात अंतर्गत रस्ते करण्यात आले. निमल इंनसीनीरेटर आणि कर्मचाऱ्यांना सुरक्षा साहित्य पुरविण्यात आले. तर दुसरा टप्प्यातील निधी प्राप्त होण्यापूर्वी शासनाने स्वच्छ भारत



अभियान एक या योजनेंतर्गत तब्बल १३ कोटी रुपयांची वाढीव निधी मंजूर करून शहर स्वच्छतेवर अधिक भर दिला आहे. यापूर्वी मंजूर १८ कोटींमध्ये महापालिकेला १३ कोटी रुपये अधिकचे मिळणार आहेत. त्यामुळे शहर स्वच्छतेसाठी करण्यात येणाऱ्या विविध उपाययोजनांचा विकास आराखडा आता ३१ कोटींचा असणार आहे.

### चर्चा होऊन निर्णय होईल : घोलप

घनकचरा व्यवस्थापनांतर्गत विविध कामांसाठी वाढीव निधी मिळाला आहे. या योजनेंतर्गत यापूर्वी प्राप्त झालेल्या निधीपैकी अनेक कामे करण्यात आली आहेत. वाढीव निधीमध्ये करण्यात येणाऱ्या कामाबाबत वरिष्ठांकडे चर्चा होऊन निर्णय होईल, असे महापालिका उपायुक्त मच्छिंद्र घोलप यांनी सांगितले.

### नवीन आराखड्यात असणार ही कामे

भोगाव डेपो येथे ४५ कि.मी. चे वालकंपाउंड, मृत जनावरे जाळण्यासाठी बर्निंग मशिन आणि शेड, अंतर्गत रस्ते आणि इतर दुरुस्ती कामे, १७ टो टिपर खरेदी, शास्त्रोक्त पदध्दतीने भूगर्भभरण प्रक्रिया.

या निधीमुळे भोगाव कचरा डेपो येथील कचरा विघटीकरणासाठी गती मिळणार असून बहुतांश निधी विनियोग या ठिकाणी होणार आहे. यापूर्वी मंजूर झालेल्या १८ कोटी निधीमध्ये मृत जनावरांसाठी बर्निंग मशिनसह टो डंपर, चार स्वीपर मशिन, टॅक्टर असे आवश्यक साधनसामुग्री व तांत्रिक यंत्रणांची खरेदी मोठ्या प्रमाणात होती. सर्वात महत्वाचे म्हणजे महापालिकेच्या इतिहासात सर्वच १७०० महिला व पुरुष कर्मचाऱ्यांना महापालिकेच्या इतिहासात प्रथमच ड्रेसकोड आणि साहित्य मिळत आहे. प्रन, मास्क, गमबूट, शूज, हॅण्डग्लोज, घमेली, खराटे, रेनकोट आदी साहित्य देण्यात येणार आहे. यासाठी घनकचरा व्यवस्थापनांतर्गत आलेल्या निधीतून जीएम पोर्टलवरून साधारण ८० लाख रुपयांची खरेदी करण्यात आलेली आहे.

## सौंदर्या डायमंड अँड गोल्ड दालनाचा रविवारी शुभारंभ




सुराज्य/सोलापूर

सौंदर्य डायमंड अँड गोल्ड या दालनाच्या शुभारंभ रविवार दि. ९ एप्रिल २०२३ रोजी सकाळी १० वाजता सिंदगी कॉम्प्लेक्स, व्हीआयपी रोड सोलापूर येथे होणार आहे, अशी माहिती सोनिया भुतडा व प्रकाश भुतडा यांनी पत्रकार परिषदेत दिली.

भागीरथ भुतडा आणि प्रभावती भुतडा यांच्या हस्ते हा शुभारंभ करण्यात येणार आहे. सोळा वर्षांच्या सुवर्णसेवेनंतर सोलापूरकरांना हिरे व सोन्याच्या नावीन्यपूर्ण दागिन्याच्या निवडीस आणखी वाव मिळावा.

सौंदर्य अधिक खुलावे म्हणून आकर्षक सोन्याचे व हिऱ्यांच्या दागिन्याचे हे दालन सुरू करण्यात येत आहे, असेही त्यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस उर्मिला भुतडा, तुलसीदास भुतडा, शिल्पा भुतडा, रमेश भुतडा आदी उपस्थित होते.



## हिंगमिरे यांना समाजभूषण पुरस्कार

**माळशिरस** : माळशिरस तालुक्यातील माळीनगर येथील महाराष्ट्र फौंडेशन या सामाजिक व शैक्षणिक संस्थेच्या वर्धापनदिनानिमित्त सोलापुरातील समाजसेवक विरेंद्र हिंगमिरे यांना राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. विरेंद्र हिंगमिरे यांनी वसुंधरा भगत हिचे संपूर्ण इंजिनिअरिंगचे शिक्षण पूर्ण केले, पाच हजार झाडे लावली व मेहता प्रशाला येथे लहान मुलांसाठी चिल्डरन पार्कची उभारणी केली. कोरोनाच्या काळामध्ये अन्नदान केले होते. अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी केली. मुक्या जनावरांना हिरवा चारा वाटप केले. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना हा राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार हिराचंद नेमचंद वाचनालय येथे झालेल्या कार्यक्रमात देण्यात आला. यावेळी (सहाय्यक पोलीस आयुक्त दिपक आर्वे जिल्हा क्रीडाधिकारी नितीन तारळकर, सिनेअभिनेता अक्षय बनकर, अमित ठाकूर, रणजित लोहार यांच्या हस्ते त्यांना पुरस्कार देण्यात आला.



## डॉ.बाबासाहेब आंबेडकर ट्रेड युनियनच्या पाठपुराव्याला यश

**सोलापूर** : घनकचरा व्यवस्थापन कडील कर्मचाऱ्यांना गेल्या दोन वर्षापासून साहित्य व साड्यांचे गणेशाचे वाटप नव्हते त्या अनुषंगाने महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर ट्रेड युनियन अध्यक्ष बापूसाहेब सदाफुले यांनी आयुक्त शितल तेली उगले, उपायुक्त मच्छिंद्र घोलप, मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार साहेब यांच्याकडे पाठपुरा चालू ठेवला होता. त्याला यश आले असून महिला झाडुवाली कर्मचाऱ्यांना दोन साड्या असे एकूण ६५० महिला कर्मचाऱ्यांना साड्या देण्यात आल्या. व गटारी बिगारी सफाई कर्मचारी यांना एक खाकी ड्रेस असे एकूण ७५० कर्मचाऱ्यांना खाकी ड्रेस वाटप करण्यात आले बदली रोजंदारीवर असणाऱ्या २५७ कर्मचाऱ्यांनाही लवकरच ड्रेस वाटप करण्यात येणार आश्वासन आयुक्तांनी दिल्याचे सदाफुले यांनी सांगितले.

## डॉ. आंबेडकर जयंती उत्सव कमिटी अध्यक्षपदी मारुती लोंढे



**सोलापूर** : डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव कमिटी (येडोळा, ता.तुळजापूर) च्या अध्यक्ष पदी मारुती लोंढे यांची निवड करण्यात आली आहे. येडोळा येथे सिध्दार्थ क्रिडा व युवक मंडळाच्या पुढाकारातून समस्त समाज बांधवांची एक बैठक संपन्न झाली. या बैठकीत महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव कमिटीची निवड करण्यात आली. सर्वानुमते जयंती उत्सव कमिटी अध्यक्ष पदी येथील कार्यकर्ते मारुती लोंढे, उपाध्यक्ष - सुरेश लोंढे, कोषाध्यक्ष- भानुदास लोंढे, सचिव - देवानंद लोंढे व सिध्दार्थ क्रीडा व युवक मंडळाच्या अध्यक्ष पदी - प्रवीण कांबळे, उपाध्यक्ष -गोवर्धन लोंढे - सचिव - सचिन गायकवाड, कोषाध्यक्ष - अभिषेक लोंढे यांची निवड करण्यात आली. तसेच विविध कार्यक्रम आयोजित करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतमेची सह वाद्य भव्य मिरवणूक काढून या जयंती उत्सवाची सांगता करण्याचे या बैठकीत ठरले. यावेळी सुरेश लोंढे, देवानंद लोंढे, अमित लोंढे, प्रविण कांबळे, लक्ष्मण लोंढे, अक्षय लोंढे, डॉ. सुरज लोंढे, अभय लोंढे, रमेश लोंढे, व्यंकट लोंढे, ज्ञानेश्वर गायकवाड, अमर जेटीथोर आदी उपस्थित होते.

## बुर्ला महिला महाविद्यालयात महावीर जयंती साजरी

**सोलापूर** : पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात जैन धर्माचे संस्थापक वर्धमान महावीर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांच्या हस्ते वर्धमान महावीरांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयातील प्रा. डॉ. शिरीष भोसले, प्रा. डॉ. शिवानंद भांजे, प्रा. डॉ. टी. एन. शिंदे, प्रा. डॉ. ॲनी जॉन, प्रा. डॉ. रजनी दळवी, प्रा. डॉ. अशोक एक्कलदेवी, प्रा. सुरेखा बत्तुल, प्रा. डॉ. पंचप्पा वाघमारे, प्रा. डॉ. शंकर राजे, प्रा. डॉ. रंजना बनसुडे, प्रा. राजेंद्र वडजे, प्रा. डॉ. तुकाराम शिंदे, प्रा. सविता मल्लाडे, प्रा. श्रीनिवास गुंडेली, प्रा. डॉ. स्वामी घाटुळे, प्रा. शिंगे, प्रा. डॉ. कविता मुरुमकर, प्रा. विनोद लंकेश्वर, प्रा. मल्लारी मसलखांब, प्रा. रेश्मा सुर्वे, प्रा. डॉ. दरेप्पा बत्ताले, प्रा. रईसा पठाण, प्रा. गिरीष बेनगिरी, प्रा. मोनिका आडम, प्रा. श्रीनिवास बासा उपस्थित होते.

## डॉ. आंबेडकर जयंती नियमांचे पालन करुन साजरी करावी : टाकणे

सुराज्य/पिलीव

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने माळशिरस पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक राजेंद्र टाकणे यांनी पिलीव, झिर्जेवस्ती, बचेरी, शिंगोर्णी, कुसमोड, चांदापुरी, पठाणवस्ती, सुळेवाडी येथील आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या पदाधिकारी कार्यकर्ते यांना मार्गदर्शन केले.

यावेळी बोलताना त्यांनी जयंती डालबीमुकत,पोस्टर, बॅनर, रॅलीचे आयोजन करताना विशेष काळजी घ्यावी. कोणत्याही समाजयाच्या भावना दुखावल्या जाणार नाहींत अशया पद्धतीने सामाजिक सलोखा बांधीलकी जपत विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करुन जयंती साजरी करा. शासनाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करा.महामानवांचा आदर्श घ्या, जयंती साजरी करताना दारु पिऊन धिंगाणा घालु नका यासह विविध मुददयावर उपस्थिततांना त्यांनी मार्गदर्शन केले. सुरुवातीला पत्रकार दामोदर लोखंडे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी पिलीवचे सरपंच नितीन मोहीते, शिंगोर्णीचे सरपंच अक्षय धांडोरे, बचेरीचे पोलीस पाटील अण्णासो शिकारे, आरपीआयचे नेते आबा बनसोडे, प्रवीण वाघमारे, सुजित सातपुते, दामोदर लोखंडे, संजय रोकडे, संजय पाटील, सारंग बनसोडे, अमोल काटे, अमोल वाघमारे, बापु कांबळे, देठे, हवालदार पंडीत मिसाळ, अभिजीत कणसे, राजु काळे यांच्यासह पिलीव, बचेरी, चांदापुरी, शिंगोर्णी परीसरातील मान्यवर यावेळी मोठ्या संख्येने यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पु.अहिल्यादेवींच्या पुतळ्याचे १५ दिवसात अनावरण

▶▶शिंदे-फडणवीसांना निमंत्रण ▶▶एप्रिलच्या तिसऱ्या आठवड्यात होणार उद्घाटन

सुराज्य/सोलापूर



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या नूतन प्रशासकिय भवनासमोर साकारण्यात येणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या अनावरण कार्यक्रमासाठी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निमंत्रण देण्याचा निर्णय स्मारक समितीच्या बैठकीत घेण्यात आला.

सोलापूर विद्यापीठात कुलगुरू तथा स्मारक समितीच्या कार्याध्यक्षा डॉ. मृणालिनी फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली स्मारक समितीची बैठक झाली. त्या बैठकीत मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना बोलविण्याचा निर्णय घेण्यात आला. बैठकीस समितीचे सदस्य शिवाजी बंडगर, बापू हटकर, डॉ. बाबासाहेब देशमुख, शिवदास बिडगर, मोहन तथा माऊली हळणवर, सुभाष मस्के, नागेश वाघमोडे, शिवाजी कांबळे, अमोल कारंडे, शरणू हांडे, बापू मेटकरी, सोमेश क्षीरसागर आदी उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. फडणवीस यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा ब्रांझमधील भव्य १५ फुटी पूर्णाकृती पुतळा पदमश्री पुरस्कार विजेते शिल्पकार राम सुतार यांच्याकडून तयार करून घेण्यात आल्याचे सांगितले. हा पुतळा विद्यापीठात दाखल झाल्याचेही त्यांनी यावेळी सदस्यांना सांगितले. या बैठकीत पुतळा अनावरण कार्यक्रमासंदर्भात चर्चा झाली. सर्व सदस्यांनी एकमताने राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उद्घाटनासाठी बोलावण्याचा निर्णय घेण्यात आला

येत्या दोन दिवसांत मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांची भेट घेण्याचा निर्णय सदस्यांनी घेतला. एप्रिलच्या तिसऱ्या आठवड्यात उद्घाटनाचा कार्यक्रम घेण्याचे या वेळी ठरविण्यात आले आहे. डॉ. अंजना लावंड या वेळी उपस्थित होत्या. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे यांनी आभार मानले.

## शिरभावी पाणीपुरवठा योजनेतून ६ गावांची तहान भागणार

सुराज्य/सांगोला

शिरभावी प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेतून ८२ पैकी ६ गावांच्या मागणीनुसार पाणीपुरवठा करुन नागरिकांची तहान भागविली जात आहे तर ८ ग्रामपंचायतींकडून पाणी मागणी आली आहे दरम्यान योजनेच्या मुख्य वाहिनींची गळती काढून गावांच्या मागणीनुसार संबंधित गावाला पाणीपुरवठा केला जाईल असे उपविभागीय अधिकारी डी जे माने यांनी सांगितले.

सांगोला तालुक्यात दिवसेंदिवस उन्हाळ्याची तीव्रता वाढू लागल्यामुळे ग्रामीण पाणी पुरवठा करणाऱ्या विहिरीतील पाणी पातळी कमी होऊ लागल्यामुळे गावांना पिण्याच्या पाण्याची टंचाई भासू लागली आहे अनेक ग्रामपंचायती काटकसर करून गावांना एक दिवसाआड पाणीपुरवठा करून वेळ मारून नेत आहेत तर दुसरीकडे नागरिक ग्रामपंचायतीकडून दैनंदिन पाणीपुरवठा करावा म्हणून टाहो फोडत आहे. दरम्यान मागील दोन वर्षांपासून सांगोला तालुक्याची तहान भागविणारी एकमेव ८२ गावांची शिरभावी प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना ग्रामपंचायतींच्या पाणी मागणी अभावी बंद होती. त्यामुळे मुख्य जलवाहिन्या कोरड्या पडल्या होत्या सध्या ग्रामपंचायती कडून पाणी मागणी वाढू लागल्यामुळे मुख्य टँकला जोडणाऱ्या जलवाहिनीची गळती काढून टेस्टिंगची कामे चालू असल्यामुळे मागणी असलेल्या ग्रामपंचायतीला पाणीपुरवठा करण्यास विलंब होत आहे सध्या शिरभावी योजनेतून ६ ग्रामपंचायतींच्या मागणीनुसार पाणीपुरवठा सुरू आहे तर आलेगाव, खवासपूर, लोटेवाडी, बागलवाडी, इटकी , खरातवाडी, महिम ,बलवडी , अजनाळे या ग्रामपंचायतीकडून लेखी निवेदन देऊन पाणी मागणी केली आहे. ग्रामपंचायत व सहकारी संस्थेने आपापल्या कडील पाणीपुरवठ्याची थकबाकी भरून योजनेस सहकार्य करावे असे आवाहन उपविभागीय अधिकारी डीजे माने यांनी केले आहे.

## नर्गिस दत्त ममोरियल कॅन्सर हॉस्पिटलमध्ये रेडिएशन मशिनरी कार्यान्वीत होणार

### कार्याध्यक्ष दिलीप सोपल यांची माहिती

सुराज्य/बार्शी

नर्गिस दत्त ममोरियल कॅन्सर हॉस्पिटलमध्ये ऑगस्टमध्ये १५ कोटी अंदाजपत्रकाची रेडीऐशन मशिनरी कार्यान्वीत होणार असल्याची माहिती कार्याध्यक्ष व माजी मंत्री दिलीप सोपल यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी हॉस्पिटलचे सचिव सत्यनारायण झंवर, खजिनदार बन्सीधर शुक्ला, मदन चौहाण, प्रशासकिय अधिकारी किशोर परांजपे, संचालक मनिष चौहाण, डॉ.आनंद सोपल, अनिल बंडेवार, राकेश तातेड आदी उपस्थित होते.

यावेळी सोपल म्हणाले संस्थेने संस्थापक चेअरमन स्व.डॉ.बी.एम. नेने यांचे ध्येय लक्षात घेत अत्याधुनिक रेडीएशन मशीन इलेक्टा सिनर्जी प्लॅटफॉर्म यु.के. मेक मशीन खरेदीची धोरणात्मक निर्णय घेतला आहे. या मशिनसाठी आवश्यक असणाऱ्या बंकरसाठी सुमारे १५ कोटी रूपये खर्च केले. या मशीनमुळे कर्करोग ग्रस्त रूग्णांना अत्याधुनिक रेडीएशनची सुविधा मिळणार आहे. या मशीनसाठी संस्थेने रूपये ११ कोटींची गुंतवणूक केली असून त्यातील रूपये ४ कोट एस.बी. आय. फौंडेशनच्या कार्पोरेट, सोशल रिस्पान्सबिलीटी अंतर्गत मिळणार आहे. या मशीनरींमुळे महानगरांमध्ये उपलब्ध निदान व उपचार सेवा गरजू कर्करोग ग्रस्तांना मिळणार आहे.

या रूग्णांना पेट सीटी स्कॅनची वारंवार गरज भासते. या चाचणीमुळे रूग्णाच्या आजाराचे निदान आजाराचा शरिरातील प्रार्दुभाव व आजाराच्या व्यारीीं अचुक आकलन झाल्याने औषधोपचाराची दिशा व सुयोग्य औषधाची निवड करणे सहज शक्य होणार आहे.

पेट हा इमेजिंग चाचणीचा एक प्रकार आहे. शरीरातील रोग शोधण्यासाठी ते ट्रेसर नावाच्या किरणोत्सर्गी पदार्थाचा वापर करते. पीईटी स्कॅन अवयव आणि उत्तक कसे कार्य करत आहेत हे दर्शविते. के एमआरआय आणि सिटी स्कॅनपेक्षा वेगळे आहे.

## कोळी महासंघाच्या जिल्हाध्यक्षपदी संतोष पाटील

सुराज्य/सोलापूर



कोळी महासंघाच्या सोलापूर जिल्हाध्यक्षपदी संतोष पाटील यांची निवड करण्यात आली आहे. निवडीच्या निमित्ताने शिवसेना जिल्हाप्रमुख अमर पाटील जिल्हा उपप्रमुख भिमाशंकर म्हेत्रे, कोळी महासंघाचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष अरुण लोणारी, मंत्रालय सचिव सातलिंग स्वामी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला यावेळी दक्षिण विधानसभा संघटक राजू बिराजदार सिद्धाराम व्हनमारे, संतोष घोडके, कुमार शिंदे, विठ्ठल कदम, सागर लोणारे पाटील मित्रपरिवार उपस्थित होते.

## पुणे डॉक्टर्स असोसिएशनच्या अध्यक्षपदी नरखेडचे डॉ.लवंगे



**सोलापूर** : मोहोळ तालुक्यातील नरखेड चे सुपुत्र डॉ. राज वसंतराव लवंगे. यांची पुणे डॉक्टर्स असोसिएशनच्या अध्यक्षपदी बहुमताने निवड झाली.

डॉ. राजेश देशमुख जिल्हाधिकारी पुणे, डॉ. भगवान पवार, आरोग्य प्रमुख पुणे महानगरपालिका तसेच ज्येष्ठ पत्रकार संपादक संजय आवटे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये राज लवंगे यांचा अध्यक्षपदाचा आणि त्यांच्या सर्व पदाधिकारी, कार्यकारिणीचा पदग्रहण समारंभ दिनांक ९ एप्रिल २०२३ रोजी दुपारी १ वाजता हॉल टिळक पुणे येथे आयोजित केला आहे.डॉ.राज यांनी पुण्याच्या वैद्यकीय व्यवसायात लौकिक प्राप्त केला आहे.सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून त्यांनी आषाढी व कार्तिकी यात्रेतील वारकऱ्यांना मोफत औषधोपचार करण्याचा उपक्रम सुरू केला आहे

# सेतू कार्यालय पुन्हा सुरू करण्यासाठी राजकीय सामाजिक संघटना आक्रमक

## आज पालकमंत्र्यांना साकडे घालणार, विद्यार्थ्यांना घेऊन आंदोलनाचा दिला इशारा

सुराज्य/सोलापूर

जिल्हाधिकारी कार्यालयातील सेतू कार्यालय बंद करण्यात आला आहे. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांची मोठी गौरसोय होणार असल्याने राजकिय आणि सामाजिक संघटना आक्रमक झाल्या आहेत. जिल्हाअधिकाऱ्यांना निवेदन देऊन सेतू निविदा काढण्याची मागणी करत आंदोलनाचा इशारा दिला यांची धग शनिवारी सोलापूरात येणाऱ्या पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना देखिल बसण्याची शक्यता आहे भाजप, शिवसेना, संभाजी बिग्रेड पालकमंत्र्यांना सकडे घालत सेतू चालू करण्यासाठी मागणी करणार असल्याचे सांगितले



सेतू कार्यालय बंद करून महा ई सेवा केंद्रातून दाखले देण्याचे नियोजन प्रशासनाच्या वतीने केले आहे. वास्तविक पाहता पालक आणि विद्यार्थ्यांना सेड्तू सुविधा फायदेशिर आहे. आता राजकिय आणि सामाजिक संघटना देखिल आक्रमक झाल्या आहेत. सेतू चालू करण्याची मागणी करत जिल्हाप्रशासना पाठपुरावा करत आहेत. महाईसेवा केंद्रात दाखले वेळेत मिळत नसल्याने अनेक प्रश्न उद्भवू शकतात. एखाद्या विद्यार्थ्याला वेळेत दाखला न मिळाल्यास त्याचा प्रवेश रद्द होऊ शकतो. तसेच सेतू कार्यालयात जो दाखला ३५ रुपयांमध्ये मिळत होता त्यासाठी महा-ई-सेवा केंद्रामध्ये किमान १५० ते २०० रुपये मोजावे लागणार आहेत. याशिवाय महा ईसेवा केंद्रातून यापूर्वी चुकिची कामे झाल्याचा अनुभव आहे. यामुळे भ्रष्टाचारासाठी वाव मिळणार आहे. देहावी, बारावीची परीक्षेचा निकाला लागल्यानंतर प्रवेशासाठी विद्यार्थी वेगळे दाखले मिळण्यासाठी सेतू गर्दी करतात. सेतू बंद केल्यानंतर सर्वसामान्य विद्यार्थ्यांना त्याचा मोठ्या फटका बसण्याची शक्यता आहे. त्यामुळे सेतू कार्यालय चालू करण्यासाठी राजकिय आणि सामाजिक संघटना आक्रमक झाल्या आहेत.

सेतू बंद करण्याचा निर्णय जिल्हाप्रशासनाने घेतल्यानंतर विद्यार्थ्यांची होणारी गौरसोय लक्षात घेता. जिल्हाधिकारी यांच्या चर्चा झाली आहे.शनिवारी पालकमंत्री सोलापूरात येणार आहेत. याबाबतचे निवेदन भाजपच्या वतीने देऊन सेतू संदर्भात योग्य निर्णय घेण्याची मागणी करणार आहोत

**-विक्रम देशमुख (भाजप शहराध्यक्ष)**

जिल्हाप्रशासनाचा चुकीचा निर्णय आहे. इतर शहरामध्ये जिल्हाअधिकाऱ्यांनी आपल्या आधिकारात निविदा काढली आहे. असताना सोलापूरात का नाही ? सेतू कार्यालयाची निविदा काढावी यासाठी शिवसेना आक्रमक होणार आहे. याबाबत आरोग्यमंत्री तानाजी सावंत, प्रा. शिवाजी सावंत यांच्या माध्यमातून मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास ही बाब आणुन देऊ शनिवारी पालकमंत्री सोलापूरात येणार आहेत. त्यांना देखल साकडे घालू

**-अमोल शिंदे (शिवसेना जिल्हाप्रमुख)**

सेतू सुविधा फायदेशिर आहे. ही सेवा चालू करण्यासाठी संभाजी बिग्रेडच्या माध्यमातून जिल्हाप्रशासन आणि राज्यशासनाकडे निवेदन देऊन मागणी करणार आहेत. लवकर निर्णय नाही झाल्यास विद्यार्थ्यांना घेऊन तीव्र आंदोलन करू

**-सोमनाथ राऊत (जिल्हाअध्यक्ष संभाजी बिग्रेड)**

# शेटफळच्या यात्रेत अनोखी परंपरा; सहा सेकंदात उभारला जातो मंडप

✔ सुराज्य/चिखली

**चैत्र महिन्यात राज्यभर गावोगावच्या यात्रांना सुरूवात होत असते. दरवर्षी शेकडो वर्षांपासून चालत येणाऱ्या परंपरा आजही जपल्या जातात . मात्र यातील काही परंपरा खऱ्या अर्थानं अनोख्या अशाच आहेत. मोहोळ तालुक्यातील शेटफळ येथे पाच दिवस सिद्धेश्वर यात्रेचा उत्सव धुमधडाक्यात साजरा केला जातो. याच यात्रेनिमित्त अनेक अनोख्या प्रथा आणि परंपरा साजऱ्या केल्या जातात. यात्रेनिमित्त गावातील मंदिरासमोर ठरलेल्या वेळत मंडप उभारण्याची अनोखी परंपरा येथे दरवर्षी पार पडते. पण या परंपरेचं वैशिष्ट्य म्हणजे, हा भलामोठा मंडप अवघ्या काही सेकंदात मंदिरासमोर उभा केला जातो.**



यंदाही मंडप अवघ्या काही सेकंदातच उभा करण्यात आला. अवघ्या काही सेकंदात म्हणजे, केवळ सहा सेकंदातच. काल (गुरुवारी) चैत्र पौर्णिमेला हनुमान जयंती दिवशी गावातील मंदिरासमोर बरोबर अकरा वाजून पाच मिनिटांनी गावातील तीन घराणी आणि बारा बलुतेदार या मंडपाचे चार खांब उभे करून मंडप उभारतात. मानकरी वायुवेगानं मंडप उभा करतात. ही परंपरा शेकडो वर्षांपासून चालत आलेली आहे. हा मंडप तब्बल ६० बाय ७० फुट आकाराचा आणि २० फूट उंचीचा असतो. एवढा मोठा मंडप केवळ ६० सेकंदात उभारण्यात आला आहे.


यंदाही यात्रेच्या दिवशी गावातील मानाची घराणी आणि बारा बलुतेदार एकत्र आले आणि त्यांनी मंडप उभारण्याच्या कामाला सुरूवात केली. अन् चक्क ६० सेकंदात गावातील मंदिरासमोर भलामोठा मंडप उभा राहिला. सध्या सोशल मीडियावरही मंडप उभारतानाचा व्हिडीओ व्हायरल होत आहे. सहा सेंकदात मंडप उभारण्याचा चमत्कार गावकऱ्यांनी नेमका केला कसा?

शेटफळ गावात उभारण्यात आलेल्या मंडपाचे खांब आणि त्यावरील ताडपत्री ही सकाळी बाहेर काढण्यात येते. नंतर गावातील भांगे, डोंगरे, खडके यांच्यासह मानकरी घराणी आपापल्या खांबापाशी येऊन उभे राहतात आणि बरोबर अकरा वाजून पाच मिनिटांनी क्षणार्धात हे खांब आणि मंडप उभा केला जातो. हे दृश्य पाहण्यासाठी परिसरातील गावकरी हजारोंच्या संख्येनं उपस्थिती लावतात. विशेष म्हणजे, यात्रेच्या पाचव्या दिवशी सायंकाळी पाच वाजता देखील असाच पाच ते सहा सेकंदात हा मंडप उभारला जात असल्याचं गावातील मानकरी यांनी सांगितलं. पाचव्या दिवशी म्हणजेच, यात्रेच्या शेवटच्या दिवशी भाकणूक होते आणि याच्या सत्यतेची प्रचिती वर्षभर येत राहते. सोलापूर जिल्ह्यातील अत्यंत जागृत असं देवस्थान म्हणून सिद्धेश्वर देवस्थानाची ओळख आहे.



## अवैध हातभट्टी दारूची वाहतूक; मंद्रुप पोलिसांची कारवाई

✔ **दक्षिण सोलापूर** : दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रुप पोलीस ठाणे हद्दीत विविध गावामध्ये ग्रामदेवांचे यात्रा चालु आहेत त्या अनुषगाने सपोनि रविंद्र मांजरे यांनी दिलेल्या आदेशानुसार गुन्हे प्रकटीकरण शाखेस अवैध दारू विक्री व पुरवठा करणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली. दि.५ एप्रिल रोजी गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोफौ संदीप काशीद यांना एक इसम कंदलगांव ते निबर्गी जाणारे कॅनलचे रोडने मोटार सायकल वरती बेकायदेशीररीत्या हातभट्टी दारुची वाहतुक करणार आहे अशी खात्रीशिर बातमी मिळाल्याने कंदलगांव शिवारात कॅनल रोडवर जावुन मोटार सायकलवर अवैद्य रित्या हातभट्टी दारूची वाहतुक करणारा विक्रम फुलसिंग राठोड (वय २२ वर्ष रा.भोजप्पा तांडा, कवठे ता. उत्तर सोलापुर जि. सोलापुर) यास ताब्यात घेतले. त्याचे ताब्यातुन हातभट्टी दारू वाहतुक करण्यास वापरण्यात आलेली होंडा शाईन मोटार सायकल व तिन काळे रंगाचे मोटार टयुब प्रत्येक टयुब मध्ये २५ लिटर हातभट्टी दारू प्रमाणे एकुण ७५ लिटर हातभट्टी दारू किमंत ४५००/- रू व ९००००/-रू किमंतीची मोटार सायकल असा एकुण ९४५००/-रू किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच सदर इसमास सदरची हातभट्टी दारू कोठे व कोणाकडे विक्री करणेस घेवुन जात होता असे विचारता त्याने एक दिवस आड शंकरनगर ता. दक्षिण सोलापुर येथील माझे चुलत काका अनिल उमाजी राठोड यांचे सांगणेवरून हातभट्टी दारू विक्रीकरीता त्यांना पोहच करत असल्याचे सांगीतले. त्यावरून विक्रम फुलसिंग राठोड वय २२ वर्ष रा.भोजप्पा तांडा, कवठे ता. उत्तर सोलापुर जि. सोलापुर व अनिल उमाजी राठोड रा. शंकरनगर ता. दक्षिण सोलापुर यांचेवर दारूबंदी कायदयान्वये मंद्रुप पोलीस ठाणेस गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कामगीरी ही सपोनि रविंद्र मांजरे यांचे मार्गदर्शनाखाली सपोफौ संदीप काशीद, पोकॉ संदीप काळे, दिनेश पवार, सागर चव्हाण यांनी केली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोना श्रींकांत बुरजे हे करीत आहेत.



## कारंबा विकास सोसायटीच्या चेअरमपदी विनोद मानेची अविरोध निवड

✔ **उत्तर सोलापूर** : कांरबा विविध कार्यकारी सेवा सोसायटीच्या चेअरमपदी मा.पृथ्वीराज माने युवा मंचचे सदस्य विनोद काशीनाथ माने, व्हा.चेअरमपदी छाया कांबळे, शंकरराव माने विविध कार्यकारी सोसायटीच्या चेअरमपदी विनोद पेंडपाले,व्हाइस चेअरमपदी सुरेश मस्के यांची अविरोध निवड झाली. यावेळी सरंपच तुकाराम काळे, उपसरपंच ज्ञानेश्वर जगताप,महादेव जाधव,उत्तरेश्वर भुट्टे,दत्तात्रय पवार पृथ्वीराज दुधाळ,काशीनाथ माने विश्वनाथ जगताप,सह संचालक, कार्यकर्ते उपस्थित होते.

## कुसमोड येथे हनुमान जयंतीनिमित्त ज्ञानेश्वरी पारायण सप्ताह

✔ **पिलीव** : माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथे दरवर्षी प्रमाणे रामनवमी पासुन ते हनुमान जयंती पर्यंत ज्ञानेश्वरी पारायण सोहळयाचे हनुमान मंदीरात आयोजन करण्यात आले होते.अतिशय भक्तीमय वातावरणात हा सोहळा हनुमान जयंती साजरी करुन समाप्त करणयात आला या सप्ताहात भजन ,कीर्तन या कार्यक्रमाचे तर हनुमान जयंती निमित्त हरिहर नंदन महाराज यांचे काल्याचे किर्तन तसेच दही हंडी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी ह भप गायनाचार्य अमोल टिंगरे महाराज यांनी सात दिवस गायनाचा सुंदर असा कार्यक्रम करुन सर्वांना मंत्रमुग्ध केले. सदर सप्ताहात भक्तांचा नाष्टा, जेवण याची सोय गावातील नागरिक गेल्या अनेक वर्षापासून करीत आहेत. हा सप्ताह पार पाडण्यासाठी पोपट काळभोर, बलभीम धायगुडे, हनुमंत धायगुडे, माऊली वाघ,महादेव धायगुडे, निवृत्ती सातपुते, साधु भिसे,तुकाराम वाघ,साधु भिसे,दौला गायकवाड ,पोपट माने,यांच्यासह अनेक भक्तांनी विशेष परीश्रम घेतले. तर तुषार लवटे, महावीर धायगुडे, अनंता धायगुडे, सदाशिव बोडरे यांनी सहकार्य केले. गावातुन दिंडीचे आयोजन यावेळी करणयात आले होते .हनुमान जयंतीचे औचित्य साधून यावेळी महाप्रसादाचे आयोजन करुन या सप्ताहाची सांगता करण्यात आली.

## वेळापूर ब्राह्मण सेवा संघाच्या अध्यक्षपदी देशपांडे



✔ **वेळापूर** : वेळापुर येथील संजय देशपांडे यांची वेळापुर ब्राम्हण सेवा संघाच्या अध्यक्षपदी एक मताने निवड करण्यात आली. तसेच कार्यकारणीवर निवड सर्वानुमते करण्यात आली तसेच कार्याध्यक्षपदी वरून इनामदार सचिव महेश कुलकर्णी खजिनदार विजय कुलकर्णी प्रसिद्धीप्रमुख अजित देशपांडे यांचीही निवड करण्यात आली. ब्राह्मण सेवा संघाचे नुकतीच बैठक होऊन वरील पदाधिकाऱ्यांची एक मताने निवड करण्यात आली. सुरुवातीला कै. सुभाष कुलकर्णी यांना श्रद्धांजली वाहण्यात आली .वरील पदाधिकाऱ्यांची निवड होताच संजय देशपांडे व सर्व पदाधिकारी यांचा शाल श्रीफळ फेटा देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला . तसेच यावेळी बैठकीत शिशु मंदिर वेळापूर येथे २२ एप्रिल २०२३ रोजी सायंकाळी पाच वाजता परशुराम जयंती साजरी करण्याचे ठरले या बैठकीला ब्राह्मण समाज सेवा संघाचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना संजय देशपांडे म्हणाले की आपला ब्राह्मण समाज हा सामाजिक उपक्रमासाठी व समाजातील प्रत्येकाच्या मदतीला धावण्यासाठी एकजूट झाला पाहिजे या विचारधारेतून संघटनेच्या माध्यमातून समाज बांधवांना चांगले सहकार्य केले जाईल असे आश्वासन संजय देशपांडे यांनी देऊन ब्राह्मण समाज सेवा संघाच्या बैठकीला उपस्थित राहिलेल्या सर्वांचे आभार मानले.

# सहकार महर्षी कारखान्यातील कंत्राटी कामगाराचा मुलगा बनला डॉक्टर

## गरिबीतून वडिलांनी केलेल्या कष्टाला आले यश

✔ सुराज्य/अकलूज



आजकाल समाजात डॉक्टरचा मुलगा डॉक्टर... इंजिनिअरचा मुलगा इंजिनिअर...शिक्षकाचा मुलगा शिक्षक झालेले पाहिले आहे पण एका साखर कारखान्यातील को-जनरेशन विभागात कंत्राटी काम करणा-या कामगारचा मुलगा एमबीबीएस परिक्षेत यश संपादन करून डॉक्टर बनला आहे.ते ही वडीलांनी अत्यंत हलाकीच्या परिस्थितीत कष्ट करून मुलाचे डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहिले होते ते आज प्रत्येक्षात साकारले आहे.

बाळू सोपान लोखंडे रा.माळेवाडी-अकलूज हे गेली १३ वर्ष शंकरनगर येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखान्यात कंत्राटी कामगार म्हणून काम करत आहे.आपल्या मुलाने चांगले शिक्षण घ्यावे व उच्चशिक्षित व्हावे हेच त्यांचे ध्येय होते.मुलाने ही लहानपणापासून डॉक्टर होण्याचे स्वप्न बघीतले होते.पण ते स्वप्न पूर्ण करण्यासाठी घरची आर्थिक परिस्थिती जेमतेम असल्यामुळे वडीलांनी पडेल ते कष्ट करून मुलाचे शिक्षण पुर्ण केले आहे.वेळ प्रसंगी सहकार महर्षी कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते पाटील यांनी सेवक कल्याण निधीच्या माध्यमातून आर्थिक मदत केली तर मित्र मंडळींनी वेळोवेळी सहकार्य केले आहे.वेळ प्रसंगी बाळू लोखंडे यांच्या पत्नी सौ. अलका लोखंडे यांनी ही महिला बचत गटाच्या माध्यमातून मुलाला शिक्षणासाठी हातभार लावला.

बाळू लोखंडे यांचा मुलगा डॉ. स्वप्नील लोखंडे याचा नुकताच एमबीबीएसचा निकाल जाहीर झाला.या परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होऊन हे यश संपादन केले आहे.त्याचे पहिली ते चौथीचे शिक्षण जिल्हा परिषद शाळा डिसकळ (ता.खटाव जि.सातारा) येथे झाले असून पाचवी ते बारावी पर्यंतचे शिक्षण सदाशिवराव माने विद्यालय अकलूज येथे घेतले आहे.बारावी नंतर इस्लामपूर (ता.वाळवा जि.सांगली) येथील प्रकाश इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स अँड रिसर्च येथे डॉक्टर पदवी प्राप्त केली आहे.तसेच बाळू लोखंडे यांची मुलगी कु. सायली बाळू लोखंडे हिने बी.एस्सी. डिएमएलटी शिक्षण घेतले असून ती सध्या अकलूज येथील नामांकित पॅथॉलाजी लॅबमध्ये सध्या जॉब करीत आहे.



## बसवा एक्सप्रेसला अक्कलकोट रोड स्थानकावर थांबा मिळाला : खा.डॉ. जयसिध्देश्वर

✔ सुराज्य/अक्कलकोट

गेल्या अनेक महिन्यानपासून बागलकोट, सोलापूर, बेंगलोर, म्हैसूर या मार्गावर धावणाऱ्या बसवा एक्सप्रेस रेल्वेस (म्हैसूर - बागलकोट - म्हैसूर) या गाडीस अक्कलकोट रोड स्थानकावर थांबा मिळावा यासाठी खा. डॉ. जयसिध्देश्वर महास्वामीजी यांनी पाठपूरावा केला होता. महाराष्ट्र व कर्नाटकातील अनेक ठिकाणी जोडणाऱ्या या रेल्वेमूळे सोलापूर व अक्कलकोट भागातील प्रवाश्यांच्या सोयीकरीता अक्कलकोट रोड स्थानकावर रेल्वे मंत्र्यांनी थांबा दिल्याचे खा. डॉ. जयसिध्देश्वर महास्वामीजी यांनी सांगितले. यामुळे बेंगलोर पर्यंत जाणाऱ्या प्रवाश्यांना मोठी सोय होणार असल्याचे सांगितले.

केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णवजी, रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे पाटील यांच्याकडे वेळोवेळी केलेल्या पाठपुराव्यामुळे रेल्वे क्रमांक १७३०७/०८ (म्हैसूर - बागलकोट - म्हैसूर) या गाडीस अक्कलकोट रोड स्थानकावर थांबा मिळाला आहे. या प्रश्नी वेळोवेळी लोकसभेत केंद्रीय रेल्वेमंत्री, मध्ये रेल महाप्रबंधक, डी.आर.एम. सोलापूर यांच्याकडे पाठपुरावा केला होता. त्यानंतर या मागणीस यश मिळाले आहे. येत्या सोमवारी १० एप्रिल रोजी संध्याकाळी मिळणारा पहिला थांबा असून त्याचे मोठ्या उत्साहात स्वागत केले जाणार आहे. यावेळी अक्कलकोट तालुक्यातील मान्यवर, शेतकरी, गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन खा. डॉ. जयसिध्देश्वर महास्वामीजी यांनी केले आहे.

रेल्वे क्रमांक १७३०७ ही गाडी अक्कलकोट रोड स्थानकावर पहाटे ४ वाजून ५९ मिनिटास थांबा घेणार आहे. तर रेल्वे क्रमांक १७३०८ ही गाडी अक्कलकोट रोड स्थानकावर रात्री ७ वाजून ५५ मिनिटास थांबा घेणार आहे. केवळ १ मिनिट ही रेल्वे थांबा घेऊन पुढे मार्गक्रमण करेल. यामुळे अक्कलकोट रोड स्थानक भागातील अनेक गावातील प्रवाश्यांना थांबा नसल्याने सोलापूर यावे लागत होते. आता अक्कलकोट रोड रेल्वे स्थानकावर ही सोय झाल्यामुळे प्रवाशांसह तीर्थयात्रेकरुंना दिलासा मिळाला आहे.



# शोभेच्या दारुकामाने उजळली वेळापूर नगरी

✔ सुराज्य/वेळापूर

वेळापूर येथील श्री अर्धनारी नटेश्वराचा साड्याचा कार्यक्रम हजारो भाविकांच्या साक्षीने हर हर महादेवाच्या जय घोषात संपन्न झाला. डफडे व हलगीच्या निनादात निघालेली कावड यात्रा व शोभेच्या दारुकामाने वेळापूर नगरी उजळून निघाली .

रात्री नऊ वाजता अर्धनारी नटेश्वरला साड्याचा पोशाख देशपांडेच्या वाड्यातून वेळापूरचे सरपंच रजनीश बनसोडे, उपसरपंच तानाजी चव्हाण, यात्रा कमिटी अध्यक्ष मिलिंद सरतापे, कार्याध्यक्ष विनायक माने, खजिनदार जावेद मुलाणी, उपाध्यक्ष धनंजय शिवपूजे व यात्रा कमिटीचे सदस्य तसेच श्याम व गौरीशंकर गाढवे यांनी वाजत गाजत मंदिरात आणला. रात्री १०.०० नंतर मानाच्या सर्व कावडी मंदिरात येण्यास सुरुवात झाली. सर्व कावडी देवाच्या दारात आल्यानंतर रात्री १२.२० वाजता देवाच्या साड्याचा कार्यक्रम विधिवत पूजा संपन्न झाली. शोभेचे दारू काम करण्यात आले. यावेळी देवाची आरती होऊन पालखी मधील महादेवाला व पार्वतीला बाशिंगे बांधण्यात आली. त्या ठिकाणी पालखी मधील देवाची आरती होऊन पालखीची मंदिराला प्रदक्षिणा घालून, पालखी गावाला प्रदक्षिणा घालण्यासाठी प्रवेश दारापाशी आणण्यात आली . देवाला साडे लागल्यानंतर एक तास उशिराने देवाची पालखी ग्राम प्रदक्षिणा घालण्यासाठी कावडी समवेत मिरवणुकीने निघाली.

देवाच्या साड्याच्या कार्यक्रमाचे पोरोहित्य पुजारी महेश गुरव, जगदीश गुरव, योगेश गुरव तसेच महेश स्वामी, विवेक जोशी यांनी केले.

देवाचा साड्याचा कार्यक्रम पार पाडण्यासाठी वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी निलेश बागाव यांनी बंदोबस्त चोख ठेवला होता. साड्याच्या कार्यक्रमाला राष्ट्रवादी कॉंग्रेसचे उत्तमराव जानकर माजी सरपंच विमल जानकर, धानोरे माजी सरपंच जीवन जानकर, डॉ स्नेहल जानकर , वेळापूर सरपंच रजनीश बनसोडे ,उपसरपंच तानाजी चव्हाण, यात्रा कमिटी अध्यक्ष मिलिंद सरतापे, कार्याध्यक्ष विनायक माने, खजिनदार जावेद मुलाणी, उपाध्यक्ष धनंजय शिवपूजे, हनुमंत कदम काशीनाथ आडत हनुमंत कदम,दासाहेब घाडगे, संदीपतात्या माने देशमुख, संजय देशपांडे, हनुमंत वायदंडे , निवृत्ती भुसारे, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष युवराज मंडले, विश्वास वाघे, महादेव म्हेत्रे, सुखदेव आडत , जीवन वाघे, चंद्रकांत पोळ ,शंकर आडत , लखन मंडले ,शिवाजी मंडले, जवान माने देशमुख ,नागेश क्षीरसागर ,नवनाथ वाघमारे, राहुल सराटे, नितीन चौगुले ,बाबा चंदनशिव श्याम गाढवे, गौरीशंकर गाढवे, मोहन पालकर यांच्यासह हजारोंच्या संख्येने भाविक साड्याच्या कार्यक्रमाला उपस्थित होते.

## दुचाकीवर आलेल्या दोघांनी हातातील मोबाईल पळवला

✔ **सोलापूर** : सहारा नगर रोडवर थांबलेल्या महम्मद इलियास बशीरअहमद शेख (वय-५०, रा.सहारा नगर) यांच्या हातातील पाच हजारांचा मोबाईल दुचाकीवर आलेल्या दोघांनी पळविला. ही घटना ५ एप्रिल रोजी सायंकाळी घडली. याप्रकरणी विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा तपास पोसई शेख करत आहेत.

# चपळगाववाडीचे ग्रामदैवत श्री रेवणसिद्धेश्वर यात्रेस रविवारी प्रारंभ

✔ सुराज्य/अक्कलकोट

तालुक्यातील खारबेळी रोटी, हूग्गी पंचक्रोशात प्रसिद्ध असलेले चपळगाववाडी ग्रामदैवत श्री रेवणसिद्धेश्वर यात्रा दिनांक ०९ एप्रिल पासून प्रारंभ होणार आहे. ०९ एप्रिल रोजी सकाळी ०४:०० वाजले पासून श्री चरणी भक्तगण व भाविकांची दंडवत ०५ वाजता श्रींच्या मूर्तीस तैलाअभिषेक रुद्र पूजा ठीक सायंकाळी ०६ वाजता श्रींची पालखी नंदीध्वज काटी, पारंपरिक वाद्य, दारुगोळा व भव्य रोषणाई यांच्या संयुक्तिक भव्य मिरवणूक रात्रीं ८ वाजता पंचक्रोशात प्रसिद्ध असे खारबेळी रोटी हुग्गी महाप्रसाद सेवा रात्री १०:०० वाजता रेवणसिद्धेश्वर नाट्यसंग चपळगाववाडी यांनी अभिनय केलेले सुंदर सामाजिक नाटक बडवन वडलू भेंकिय सिडलू अर्थात (ताई मोदलो ताळी मोदलो) सोमवार दिनांक १० एप्रिल रोजी सकाळी ०६ वाजता श्रींच्या मूर्तीस महारुद्राभिषेक सकाळी ०९ वाजता श्रींची पालखी पारंपरिक वाद्य, नंदीध्वज काटे व रेवणसिद्धेश्वर भजनी मंडळ भजन युक्त भव्य मिरवणूक सायंकाळी ०४:०० वाजता जंगी मल्लांची कुस्ती तसेच ठीक रात्री १०:०० वाजता रेवणसिद्धेश्वर तरुण नाट्यसंघ अभिनय केलेले सुंदर सामाजिक कन्नड नाटक समाजके शिक्षा अर्थात (विधवेगे कट्टीद ताळी ) या दोन दिवशी यात्रेचा पंचकोशातील सकल सदभक्तांनी आस्वाद घेऊन पुनीत व्हावे असे आव्हान श्री रेवणसिद्धेश्वर पंच कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.



सस्नेह निमंत्रण

राज्यस्तरीय मराठी ग्रामीण साहित्य संमेलन, सांगोला

(सहाय्यक संस्था : सद्गुरु गजानन महाराज एज्युकेशन सोसायटी, पॅरामेडिकल इन्स्टिट्युट, सांगोला)

संमेलनाध्यक्ष- मा. श्री. इंद्रजित भालेराव
स्वागताध्यक्ष- मा. आ. शहाजीबापू पाटील

दिनांक ८ ते १० एप्रिल २०२३
ग. दि. माडगूळकर साहित्य नगरी, सांगोला विद्यामंदिर प्रशाला, सांगोला

उद्घाटन समारंभ
शनिवार, ८ एप्रिल सकाळी ११.०० ते दुपारी ०१.००

उद्घाटक : मा. ना. सुधीरभाऊ मनगंटीवार (मंत्री, सांस्कृतिक कार्य., महाराष्ट्र राज्य)
अध्यक्ष : मा. इंद्रजित भालेराव (संमेलन अध्यक्ष)
प्रमुख उपस्थिती : मा. ना. राधाकृष्ण विखे-पाटील (मंत्री, महसुल तथा पालकमंत्री, सोलापूर जिल्हा)

विशेष उपस्थिती : मा. खा. रणजितसिंह निंबाळकर, मा. आ. समाधान दादा आवताडे
मा. दिपक आबा साळुंके-पाटील (माजी आमदार), मा. प्रशांतराव परिचारक (माजी आमदार)
मा. मिलिंद शंभरकर (जिल्हाधिकारी सोलापूर), मा. आप्पासाहेब समिंदर (उपविभागीय अधिकारी)

समारोप व गौरव समारंभ
सोमवार, १० एप्रिल दुपारी ०२.३० ते ०५.३०

अध्यक्ष : कवी इंद्रजित भालेराव
प्रमुख अतिथी : मा. ना. दिपक केसरकर (संमेलन अध्यक्ष)
गौरवमूर्ती : मा. डॉ. द. ता. भोसले, मा. योगिराज वाघमारे, मा. भास्कर चंदनशिव, मा. डॉ. कृष्णा इंगोले

प्रमुख उपस्थिती : मा. किशोर कदम (ज्येष्ठ अभिनेते व कवी, सौमित्र), मा. आ. शहाजीबापू पाटील (स्वागताध्यक्ष)
मा. आ. समाधानदादा आवताडे (वि. स. स. पंढरपूर-मंगळवेढा),
मा. दिलीप स्वामी (मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. सोलापूर) मा. राजश्री पाटील (उपविभागीय पोलीस अधिकारी)

विनीत -
राज्यस्तरीय मराठी ग्रामीण साहित्य संमेलन, सांगोला संयोजन समिती
अध्यक्ष : श्री. बाबुराव गायकवाड, उपाध्यक्ष : मा. श्री. दीपक आबा साळुंखे-पाटील कार्याध्यक्ष : श्री. प्रा. प्रबुद्धचंद्र झपके,
उपकार्याध्यक्ष : श्री. भाऊसाहेब रुपनर सचिव : श्री. दादासाहेब रोंगे सहसचिव : श्री. ॲड. उदयबापू घोंगडे
खजिनदार : श्री. रफिक नदाफ समन्वयक (शासकीय) : श्री. आनंद रा. लोकरे (गटविकास अधिकारी, पं. स. सांगोला)
सहाय्यक संस्था प्रतिनिधी : श्री. सोमेश यावलकर

# नितीन गडकरी अतिरेकी संघटनांच्या रडारवर



## आरोपी पुजारीकडून धक्कादायक खुलासा

सुराज्य/मुंबई

**केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या जनसंपर्क कार्यालयात तब्बल २ वेळा फोन करून त्यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली होती. त्यानंतर पोलीस यंत्रणा पूर्णपणे सतर्क झाल्या होत्या. तसेच नागपूर पोलिसांनी आरोपी जयेश पुजारीचा ताबा मिळवला होता. जयेश पुजारीची वरिष्ठ पोलिसांकडून कसून चौकशी केली जात आहे. त्यामुळे या प्रकरणी अनेक धक्कादायक खुलासे समोर येत आहेत. परंतु नितीन गडकरी हे अतिरेकी संघटनांच्या रडारवर असल्याचं म्हटलं जात आहे. या प्रकरणाचा धक्कादायक खुलासा आरोपी जयेश पुजारीच्या चौकशीतून समोर आला आहे.**

जयेश पुजारीला पोलिसांनी ताब्यात घेतलं असलं तरी आणि तुरुंगात असून सुद्धा त्याच्याकडे फोन उपलब्ध होते. त्यामुळे तो आपल्या कुटुंबियांशी सातत्याने संवाद साधायचा.

त्याला मांसाहारी जेवण तुरुंगात उपलब्ध करून दिलं जात होतं. जयेश पुजारी मागील १२ वर्षांपासून वेगवेगळ्या तुरुंगात आहे. परंतु बेळगावच्या तुरुंगात त्याला सर्व प्रकारच्या सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. मात्र, या सर्व सोयीसुविधा कुणाच्या माध्यमातून केल्या जात आहेत, याची माहिती अद्यापही समोर आलेली नाहीये. परंतु गडकरी धमकी केसचा तपास केंद्रीय तपास यंत्रणेकडे सोपवणार असल्याचं सांगितलं जात आहे.

## उत्तरप्रदेशात भाजपकडून विरोधकांना शह

**सुराज्य/उत्तर प्रदेश :** भारतीय जनता पक्षासाठी २०२४ मध्ये केंद्रात पुन्हा सत्ता मिळवायची असेल तर तो मार्ग उत्तरप्रदेशातून जातो. त्यामुळे या राज्यातील लोकसभेच्या ८० जागांवर भाजपचे विशेष लक्ष्य आहे.

उत्तरप्रदेश विधान परिषदेवर राज्यपाल नियुक्त सहा सदस्यांची घोषणा नुकतीच करण्यात आली. त्यात भाजपने जातीय संतुलन राखण्यावर भर दिला आहे. दोन इतर मागासवर्गीय समाजांतील व्यक्ती तसेच दलित व पसमंदा मुस्लीम, ब्राह्मण व वैश्य अशा विविध समाजघटकांना संधी देण्यात आली आहे. भाजपने सामाजिक समीकरणांबरोबरच 'सबका साथ' या आपल्या घोषणेला अनुसरून अलीगड मुस्लीम विद्यापीठाचे माजी कुलगुरू तारिक मन्सूर यांना वरिष्ठ सभागृहात पाठवले आहे. भाजप हा मुस्लीमविरोधी नाही हा संदेश या नियुक्तीतून पक्षाने दिला आहे.

## सावधान

# टायर घासलेल्या चारचाकी वाहनांना 'समृद्धी'वर नो एंट्री

### अपघातांवर नियंत्रणासाठी दंडात्मक कारवाई

**सुराज्य/नागपूर : टायर घासलेल्या अवस्थेत समृद्धी महामार्गावरून जाऊ इच्छिणाऱ्या दोन चारचाकी वाहनांवर प्रादेशिक परिवहन विभागाने (आरटीओ) गुरुवारी प्रतिबंध घातला. या तिन्ही वाहनांवर प्रत्येकी २० हजारांचा दंड ठोठावण्यात आला. अशा प्रकारची राज्यातील ही पहिलीच कारवाई आहे.**

समृद्धी महामार्गावर सातत्याने होणारे प्राणांकित अपघात सर्वसामान्य नागरिकांसह सरकारचीही चिंता वाढवत आहेत. त्यामुळे राज्याच्या परिवहन खात्याने अपघात नियंत्रणासाठी येथे आता आरटीओच्या मदतीने वाहनांची तपासणी, सक्तीने समुपदेशन सुरू केले आहे. त्याअंतर्गत गुरुवारी नागपूर आरटीओने 'ट्रेड डेप्थ इंडिकेटर'ने चारचाकी



वाहनांचे टायर तपासले. त्यात टायरमधील रबरची घनता तपासण्यात आली.

यावेळी काही वाहनांचे टायर जास्त घासलेले आढळले. या टायरसह सलग वाहन चालवणे धोकादायक होते. त्यामुळे या दोन्ही वाहनांना महामार्गावरून जाण्यास प्रतिबंध घातला गेला. सोबत या दोन्ही वाहनांवर केंद्रीय मोटार वाहन रस्ता सुरक्षा कायदा १९० अंतर्गत प्रत्येकी २० हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला, अशी माहिती नागपूर ग्रामीणचे प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय चव्हाण यांनी दिली.

# प्रेयसीने नकार दिल्याचा सूड

## पुण्यातील नेत्यांना खंडणीसाठी दिल्या धमक्या

## गाडीचा नंबरही तिचाच

सुराज्य/पुणे



पुणे शहरात गेल्या काही दिवसांपासून राजकीय नेत्यांना धमकी देण्याचा प्रकार समोर आला होता. नेत्यांकडे ३० लाख रुपयांच्या खंडणीची मागणी करुन ती न दिल्यास जीवे ठार मारण्याची धमकी दिली जात होती. वारंवार घडणाऱ्या या घटनांमुळे पुणे पोलिसांवरील ताण चांगलाच वाढला होता. अखेर आरोपीला खंडणी विरोधी पथकाने अटक केली आहे. गर्लफ्रेण्डने लग्नाला नकार दिल्याच्या रागातून तिच्यावरील सूड उगवण्यासाठी तरुणाने तिच्या नावे धमक्या दिल्याचा आरोप आहे. इम्राल शेख (वय अंदाजे २५ वर्षे, रा. कोंढवा) असे या आरोपीचे नाव आहे. खंडणी विरोधी पथकाने त्याला पुण्यातून अटक केली आहे.

मनसेचे माजी नगरसेवक वसंत मोरे यांच्या मुलाला पहिल्यांदा धमकी देण्यात आली होती. त्यानंतर भाजप सरचिटणीस आणि पुण्याचे माजी महापौर मुरलीधर मोहळ यांच्या नावाने एका अज्ञात व्यक्तींकडे खंडणी मागण्यात आली होती. तर त्यानंतर काँग्रेसचे माजी नगरसेवक अविनाश बागवे यांनाही खंडणीसाठी व्हॉट्सअ‍ॅपवर मेसेज आणि फोन आले होते. गुरूवारी पिंपरी-चिंचवडचे भाजप शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांच्या कार्यालयातील मोबाईलवरही ३० लाख रुपयांच्या खंडणीची मागणी करणारा मेसेज आला होता. या सगळ्या प्रकरणांमध्ये आरोपीचा पॅटर्न बऱ्यापैकी सारखा होता. या घटनेत सगळ्या नेत्यांना एका मुलीच्या नावाने खंडणी मागितली जात होती. पुणे खराडी येथे एका इमारतीच्या पार्किंगमध्ये एका इनोव्हा गाडीत पैसे ठेवायला हा आरोपी सांगायचा.


या घटनेमागील कहाणी धक्कादायक आहे. आरोपी इम्रानला एका मुलीसोबत लग्न करायचं होतं. मात्र मुलीने लग्नाला नकार दिला. त्याचा राग मानात धरून त्याने मुलीची बदनामी करण्याच्या हेतूने हा प्लॅन आखला. तो संबंधित मुलीच्या नावाने राजकीय नेत्यांना धमकी द्यायचा आणि त्या मुलीच्या गाडीचा नंबर सांगून त्यात रक्कम ठेवण्यासाठी सांगत होता, अशी प्राथमिक माहिती मिळालेली आहे.

# रक्तासाठीचे शुल्क वाढले

## खासगीत पूर्वीचे दर; रक्तसंक्रमण परिषदेच्या निर्देशानंतर वाढण्याची शक्यता

सुराज्य/संभाजीनगर

**दोन रक्तघटकांचे शुल्क वाढवण्यास राज्य सरकारच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने मान्यता दिली आहे. अर्थात या दरवाढीची अंमलबजावणी सरकारी रक्तपेढी झाली असली तरी अद्यापही अनेक खासगी रक्तपेढींकडून ही दरवाढ करण्यात आलेली नाही. मात्र, राज्य रक्तसंक्रण परिषदेच्या सूचनेनंतर ही दरवाढ होऊ शकते, असेही संकेत आहेत.**



संबंधित शुल्कवाढ ही केवळ 'होल ब्लड' व 'पॅक्ड रेड सेल्स' या दोनच प्रकारात झाली आहे. इतर घटकांचे शुल्क हे पूर्वीप्रमाणेच आहेत, असेही सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पत्रामध्ये स्पष्ट झाले आहे. शासकीय रक्तपेढीत 'होल ब्लड'साठी पूर्वी ८५० रुपये शुल्क आकारले जात होते. त्यासाठी आता २५० रुपयांच्या शुल्कवाढीला मान्यता मिळाल्याने 'होल ब्लड'साठी ११०० रुपये शुल्क असणार आहे. तसेच 'पॅक्ड रेड सेल्स'चेही शुल्क ८५० रुपयांवरुन ११०० रुपये करण्यात आले आहेत. याच दोन्ही घटकांसाठी पूर्वी खासगी रक्तपेढीमध्ये १४५० रुपयांपर्यंत शुल्क आकारण्यास मान्यता होती. आता त्यात १०० रुपयांची शुल्कवाढ आरोग्य विभागाने मान्य केल्याने दोन्ही घटकांचे शुल्क १५५० रुपये झाले आहे. मात्र, अद्याप अनेक खासगी रक्तपेढींमध्ये ही शुल्कवाढ झालेली नाही.

## आंध्रप्रदेशच्या माजी मुख्यमंत्र्यांनी सोडला काँग्रेसचा हात

सुराज्य/हैद्राबाद



**काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि आंध्रप्रदेशचे माजी मुख्यमंत्री किरण कुमार रेड्डींनी शुक्रवारी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे. त्यांनी गेल्या महिन्यात काँग्रेसला रामराम ठोकला होता. तेव्हा पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना एका ओळीचे राजीनामा पत्र पाठवले होते.**

रेड्डींनी काँग्रेस सोडण्याची ही काही पहिली वेळ नाही. २०१४ मध्ये काँग्रेस प्रणित यूपीए आघाडीने आंध्र प्रदेशमधून तेलंगणा हे वेगळे राज्य स्थापन करण्याचा निर्णय घेतला होता, तेव्हाही रेड्डी यांनी पक्ष सोडला होता. तेव्हा त्यांनी जय सम्यकांध्र पक्ष स्थापन केला होता. रेड्डी यांनी या पक्षाच्या बॅनरखाली विधानसभा निवडणुकीत उमेदवारही उभे केले होते. त्यांना एकाही जागेवर यश मिळाले नव्हते. यानंतर २०१८ मध्ये किरण कुमार रेड्डी यांनी पुन्हा घरवापसी करत काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता.




## अनावश्यक खर्च टाळत उचलला ११ गरजू विद्यार्थ्यांचा शैक्षणिक खर्च

**सुराज्य/सोलापूर :** शंभू-शिवाय बहुद्देशीय सामाजिक संस्थेने श्री हनुमान जन्मोत्सवनिमित्त मिरवणूक व अनावश्यक खर्च टाळत ११ गरजू विद्यार्थ्यांच्या एक वर्षाचा शैक्षणिक खर्च उचलला.

जय हनुमान, करु शिक्षणाचा सन्मान म्हणत अनोखा आदर्श समाजासमोर ठेवला आहे. शंभू-शिवाय बहुद्देशीय सामाजिक संस्थेतर्फे श्री हनुमान जन्मोत्सवानिमित 'श्रीं'चे पूजन शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांच्या हस्ते समाजबांधवांसह मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. अमोल शिंदे यांची मराठा सेवा नागरी पतसंस्था चेअरमनपदी तिसऱ्यांदा बिनविरोध निवड झाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष आनंद राजू चौगुले यांच्यावतीने विशेष सत्कार करण्यात आला. तसेच यावेळी उपस्थित मान्यवरांचा संस्थेतर्फे सत्कार करण्यात आला. यावेळी प्रकाश शिंदे, जगन्नाथ काळे, रंगनाथ पवार, मच्छिंद्र जाधव, राजू चौगुले, शिवकुमार कामाठी, राजेश पांढरे, नागेश चौगुले, गजेंद्र माशाळ, रमेश विटकर, दादा पवार, प्रवीण वाडेकर, मनीष चव्हाण, विक्रम जाधव, दत्ता साळुंखे, विकी देवकर, आकाश कुलकर्णी आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शंभू-शिवाय बहुद्देशीय सामाजिक संस्थेच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांनी परिश्रम घेतले.

## अपूर्वा आता 'शाहीन आपा'च्या भूमिकेत

**सुराज्य/सोलापूर :** आपल्या अभिनयाने आणि बिनधास्त स्वभावाने कायमच चर्चेत राहणारी अभिनेत्री अपूर्वा नेमळेकर नवीन काय घेऊन येणार? याची उत्सुकता कायमच तिच्या चाहत्यांना असते. वेगवेगळ्या भूमिकांमधून प्रेक्षकांचे मनोरंजन करणारी अपूर्वा आता एका नव्या भूमिकेसह प्रेक्षकांचं मनोरंजन करायला सज्ज झाली आहे. अपूर्वा आता एका अनोख्या अंदाजात दिसणार आहे.

आरस्पानी सौंदर्य आणि धारदार नजर यांचा सुरेख मिलाप असणारी करारी बाण्याची 'शाहीन आपा' ही भूमिका अपूर्वा लवकरच प्रदर्शित होणाऱ्या 'रावरंभा' चित्रपटात साकारणार आहे. येत्या १२ मे ला इतिहासातील हे 'मोरपंखी पान' पडद्यावर रसिकांसमोर उलगडणार आहे.

## 'मराठी पाऊल पडते पुढे' ५ मे रोजी प्रदर्शित

**सुराज्य/सोलापूर :** 'मराठी पाऊल पडते पुढे...' ह्या ओळींत प्रचंड उर्जा आहे. गाणे असो वा शीर्षक ऐकल्यावर मराठी मन आणि मनगटात ती उर्जा संचारते. निर्माता प्रकाश बावीस्कर यांच्या शिवलाईन फिल्म्सची निर्मिती-प्रस्तुती असलेला आणि अंकात फिल्म्सच्या चंद्रकांत विसपुते यांची सहनिर्मिती असलेल्या 'मराठी पाऊल पडते पुढे' ह्या चित्रपटाने मराठी माणसाच्या स्वयंसिद्धतेसाठी प्रगतीच्या दिशेने केलेली वाटचाल अधोरेखित केली आहे.

हा चित्रपट ५ मे रोजी महाराष्ट्रभर प्रदर्शित होणार आहे. खानदेशातील शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या पण संघर्षातून अन्यायाशी दोन हात करत व्यावसायिक बनणाऱ्या तरुणाची ही यशोगाथा आहे. मराठी मालिका विश्वातून थेट ८३ ह्या बॉलीवूडपटात झळकलेला, स्टार क्रिकेटपटू संदीप पाटील यांचा चिरंजीव अभिनेता चिराग पाटील ह्या चित्रपटाचा मुख्य नायक आहे. रांगड्या नायकाची भूमिका त्याने साकारली आहे.

## जागतिक आरोग्य दिनानिमित्त उपक्रम

# सामुदायिक प्रयत्नातून उत्तम आरोग्य देता येईल

### डॉक्टरांच्या चर्चासत्राचा सूर

सुराज्य/सोलापूर

प्रत्येकास शुद्ध हवा, शुद्ध पाणी मिळाल्यास, सांडपाण्याची व स्वच्छ शौचालयाची व्यवस्था झाल्यास, वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छतेची सवय लावून घेतल्यास, वेळीच लसीकरण करून घेतल्यास, वेळच्यावेळी मधुमेह, रक्तदाब तपासणी करून घेतल्यास, डॉक्टरांचा सल्ला ऐकल्यास उत्तम आरोग्य देता येते. डॉक्टरांचे पन्नास टक्के काम कमी होऊ शकते त्यासाठी शासनाप्रमाणेच सामुदायिक प्रयत्नांची आवश्यकता आहे. असा सूर जागतिक आरोग्यदिनानिमित्त इंडियन रेडक्रॉस सोसायटी शाखा सोलापूर, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया. शाखा सोलापूर व दमाणी ब्लड सेंटर




यांच्या संयुक्त विद्यमाने स्वयंसेवी संस्थांच्या कर्मचाऱ्यांसाठी आयोजित चर्चासत्रात निघाला. या चर्चासत्राचे उद्घाटन दमाणी ब्लड सेंटरच्या हॉलमध्ये सुप्रसिद्ध मेंदूविकार तज्ञ डॉ. शिरीष वळसंगकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलित करून करण्यात आले.

यावेळी मंचावर दमाणी ब्लड सेंटरचे चेअरमन डॉ. राजीव प्रधान, सुप्रसिध्द कर्करोगतज्ञ व सर्जन : डॉ. शिरीश कुमठेकर, प्राचार्य के. एम. जमादार, प्रा. डॉ. आयेशा रंगरेज, डॉ. श्रीकांत कामतकर हजर होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर हे होते.

आपल्या भाषणात डॉ. शिरीष वळसंगकर म्हणाले की, 'उत्तम आरोग्यविषयक सेवा शासकीय रुग्णालयात उपलब्ध झाल्या पाहिजेत, प्रत्येकाने वैयक्तिक व सामाजिक आरोग्याचे भान ठेवले पाहिजे, शास्त्रीय दृष्टीकोनातून आहार घ्यावा.

डॉ. कुमठेकर म्हणाले, '२०२५ पर्यंत भारतात कर्करुग्णांचे प्रमाण इतके वाढेल की प्रत्येक घरात कर्करोगाचा रुग्ण सापडेल म्हणून प्रत्येकाने निसर्गारूप जीवनशैलीचा अवलंब करावा, फास्टफूड व तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन बंद करावे.'

डॉ. प्रधान म्हणाले की, 'भारतातल्या एकाही गावात पिण्याचे शुद्ध पाणी मिळत नाही. यापुढे रुग्णावर उपचार करताना रोबोटिक्स, नॅनो टेक्नोलॉजीचा वापर करुन वैयक्तिक औषधोपचार केले जातील.' याप्रसंगी डॉ. श्रीकांत कामतकर व सामाजिक कार्यकर्ते चंदूभाई देढीया यांनी मनोगत व्यक्त केले. प्रारंभी प्रा. डॉ. आयेशा रंगरेज यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. विरेंद्र परदेशी यांनी सूत्रसंचालन केले. आभार

फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, शाखा सोलापूर शाखेचे अध्यक्ष प्राचार्य के. एम. जमादार यांनी आभार मानले. या चर्चासत्राचा लाभ दहा स्वयंसेवी संस्थांच्या कर्मचाऱ्यांनी घेतला.

## मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या

# सरकारी निवासस्थानावरील खानपान खर्च कोटींत

सुराज्य/मुंबई

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा या सरकारी निवासस्थानी, तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर या सरकारी निवासस्थानी येणाऱ्या मान्यवर अतिथींच्या खानपान सेवांसाठी पुरवठादार निश्चित करण्याचा निर्णय राज्य सरकारने गुरुवारी जाहीर केला. या निर्णयानुसार वर्षा, सागर या निवासस्थानी छत्रधारी केटरर्स आणि सुखसागर हॉस्पिटॅलिटीची नियुक्ती करण्यात आली. दोन वर्षांसाठी ही नियुक्ती करण्यात आली आहे. या दोन्ही निवासस्थानी खानपानासाठी अंदाजित खर्च अनुक्रमे ३.५० कोटी आणि १.५० कोटी इतका असल्याचे सांगण्यात आले.**

वर्षा आणि सागर या निवासस्थानी मान्यवर अतिथींसाठी खानपान सेवा पुरविणाऱ्या पुरवठादाराची नियुक्ती करण्यासाठी अंदाजित ५ कोटी रुपयांची ई-निविदा गेल्या वर्षी जाहीर करण्यात आली होती. त्यानुसार एकूण तीन निविदाकारांनी अर्ज केला होता. त्यानंतर छत्रधारी केटरर्स आणि सुखसागर हॉस्पिटॅलिटी यांची निविदा निश्चित करण्यात आली, असे सामान्य प्रशासन विभागाने सरकार निर्णयाच्या माध्यमातून जाहीर केले.

या करारानुसार विविध पदार्थांचे दरही निश्चित करण्यात आले आहेत. यासंदर्भात या दोन्ही निविदाकारांशी करार करण्यात आला असून अटी आणि शर्थी पुरवठादारास बंधनकारक असणार आहेत.

या अटी आणि शर्थीचे उल्लंघन झाल्यास या कंत्राटदारांवर कारवाई करण्यात येणार आहे, असे सरकार निर्णयात नमूद करण्यात आले.




दरम्यान, या सरकार निर्णयानुसार दरांव्यतिरिक्त अन्य दराने अन्नपदार्थांचा पुरवठा केल्यास त्याबाबतचे देयक मंजूर करण्यात येणार नाही, असे यावेळी जाहीर करण्यात आले. हा करारनामा करून आवश्यक ते नोंदणी शुल्क आणि मुद्रांक शुल्क भरण्याची जबाबदारी कंत्राटदारांवर देण्यात आली.

## निधन वार्ता

### अरुण शिवदे


**सोलापूर :** येथील अरूण दत्तात्रेय शिवदे (कुलकर्णी) यांचे वयाच्या ७७व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले.



त्यांनी नागापूर, (ता. परळी, जि. बीड) येथे शिक्षक म्हणून नोकरी केली. त्यांना आदर्श शिक्षक हा पुरस्कार मिळाला होता. मुख्याध्यापक म्हणून शेवटी ते निवृत्त झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई व नातवंडे असा परिवार आहे.

### शारदाबाई फुलारी

**अक्कलकोट :** मैंदर्गी (ता. अक्कलकोट) येथील शारदाबाई हणमंतप्पा फुलारी (वय-७०) यांचे अल्पशा आजाराने शुक्रवारी दुपारी दीड वाजता निधन झाले.



त्यांची अंत्ययात्रा शनिवार दि. ८ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता राहत्या घरापासून निघणार आहे. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्या माजी नगरसेवक हणमंतप्पा फुलारी यांच्या पत्नी होत्या.

### अशोक सगरे

**पिलीव :** माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील सेवानिवृत्त शिक्षक अशोक महादेव सगरे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले.



ते ६५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, तीन भाऊ असा परिवार आहे. ते वीरशैव लिंगायत समाजाचे संघटक विजय सगरे यांचे बंधू होते.

# सोलापूरकरांनी लुटला 'उटकमंड'चा आनंद...

सुराज्य/पुरूषोत्तम कुलकर्णी

**ढगाळ हवामान, अधूनमधून वाऱ्याची छानशी झुळूक, त्यातच पडणारे पावसाचे चार थेंब, वसंत ऋतुतील नव्या पालवींचं सतत हलणं-झुलणं आणि ढगांना छेदून येणारी सूर्याची किरण. हे सारं वातावरण पाहाता शुक्रवारच्या संपूर्ण दिवसभरात सोलापूरकरांनी लुटला अद्भूत असा 'उटकमंड'चा आनंद...**



त्याचे असे की- सलग दोन दिवस सोलापूरचे 'टेम्परेचर' ४० अंश सेल्सिअसच्या पुढे गेले होते. उन्हाचे चटके बसले. सारे अंग घामाने डबडबले. जिवाची घालमेल झाली. हा सूर्यनारायण आणखीन आग ओकायला लागेल तेव्हा पुढचे दोन महिने आपली काही खैर नाही, अशी चिंता सोलापूरकर व्यक्त करत होते. पण सृष्टीची लिलाच न्यारी. हवामान खात्याचा अंदाज खरा ठरला. शुक्रवारच्या रामप्रहारात साऱ्यांना ढगाळ हवामानाचे दर्शन झाले.तशी झलक गुरूवारी सायंकाळी दिसली. काही ठिकाणी वरूणाचा शिडकावाही झाला. शुक्रवारी मात्र नियतीची किमया पहायला मिळाली. सोलापूरच्या अष्टदिशा ढगांनी व्यापल्या. क्षितिजांवर काळसर ढग दिसले. गारवा सुटला. वाटले, मोठा पाऊस होईल. गारपिट होते की काय? असेही काही क्षण वाटले. पण वरूणाला कदाचित सोलापूरकांची दया आलेली असावी.

दिवसभर ढगाळ हवामान. सूर्याची किरणे अडवण्याची ताकत कुणामध्ये तर केवळ ढगांमध्ये. पण हा भास्कर कधी कधी ऐकत नाही. ढगांनाही तो हरवतो. सकाळी अकराच्या सुमारास ढगांना छेद देत सौम्य किरणे अंगावर पडली. एरव्ही सूर्याच्या नावाने बोटे मोडणाऱ्यांना ही सौम्य किरणे दिलासा देवून गेली. काही सेकंदातच ढगांनी सूर्याला पुन्हा अडवले.

दुपारी छानशा वाऱ्यात ढगांमधून थेबं पडली. ती अंगावर झेलताना खूप मजा आली. हा दुचाकि वाहनधारकांचा अनुभव. दिवसभर वाऱ्यानं कृपा केली.

त्यामुळे सोलापूरकरांचा श्वास मोकळा मोकळा झालाच शिवाय पालवींचं हलणं आणि झुलणं पाहून मनाला समाधानही वाटलं. घाम वैगेरे अजिबात नाही. आल्हाददायक वातावरणामुळे रस्त्यावरची पोरा-पोरींची वाहनं सुसाट पळत होती. घरातील ज्येष्ठ मंडळी हा मोकळा श्वास घ्यायला सकाळी सकाळी बाहेर पडली होती. उन्हाच्या तीव्रतेतून सुटका झाली. हायसे वाटले. सोलापूरकरांची सुस्कार सोडला.पुढे वैशाख वणव्यात काय होते होवू दे.आतातरी बरे वाटले.आमच्या सोलापूरकरांची हीच वर्तमान मानसिकता.शुक्रवारचे वातावरण पाहाता मृग नक्षत्राला सुरूवात झाली काय? असेही मनाला वाटून गेले.

### काय आहे उटकमंड?

उटकमंड हा काय प्रकार आहे,असा प्रश्न आजची पोरं कदाचित विचारू शकतात.उत्तर देणं अपेक्षितच.तमीळनाडूमधील निलगिरी जिल्ह्यातील हे छोटसं शहर. बंगळुरूपासून खूपच जवळ. उटकमंडला उटीही म्हणतात. दक्षिण भारतात उदगमंडलम असेही संबोधले जाते. हे थंड हवेचे ठिकाण. लोकसंख्या केवळ ८८ हजार. पर्वत, सर्वत्र झाडी, धरणं, धबधबे, तलाव अशी उटीला नैसर्गिक देण. बारा महिने वारा. कायम ढगांची रेलचेल. अधून मधून जोरदार पावसाच्या सरी. दिवसभरात सूर्याची किरणेही पडतात. एखाद्या दिवशी नव्हे,बारा महिने हे वातावरण.कायम तिथे वसंत ऋतु. उटीला कमाल तापमान २० अंशापुढे कधीही जात नाही. पर्यटन आणि चहाचे कारखाने हे या शहराचे अर्थकारण.तिथे जन्म घेणारा अत्यंत पुण्यवान.आमच्या सोलापूरकरांना जास्त ऊन,अति पाऊस आणि कुडकुडायला लावणारी थंडी अजिबात सहन होत नाही. सर्वकाही आपल्या मनासारखं हवं असतं.वैशाख वणवा सुरू झाला की-सोलापूरकर गाड्या करून उटीला जातात.थंड हवेचा आनंद लुटतात मात्र शुक्रवारच्या दिवशी इथेच उटकमंडचा आनंद मिळावा. किती हा योगायोग ना.

### आमच्या बळीराजाचं काय?

आनंद मिळाला हे ठीक आहे पण आमच्या बळीराजाचं काय? शेतात पिकांची काढणी पडलीय. मळणी व्हायचीय. काही दिवसांपूर्वीच गारपिटीनं वाताहात करून टाकलीय. त्यात पुन्हा पावसाचा इषारा म्हटल्यानंतर बिचाऱ्या शेतकऱ्यांची घाबरगुंडी उडालीय. हातातोंडाशी आलेलं पिक मातीमोल होवू नये हीच त्याची तळमळ. एरव्ही पावसाळ्यात वरूणाची प्रार्थना करणारा शेतकरी आता येवू नको,अशीच विनवणी करत बसलाय. पण सृष्टीला त्याचीही दया आली.कुठेही मोठ्या पावसाची न्यूज नाही. सोलापूरकरांनी जसा सुस्कारा सोडला,तसा बळीराजाचा जीवही भांड्यात पडला.हवामान खात्याचा अजूनही इषारा आहेच.बघू या काय होतंय ते?

## पैसे आण म्हणत विवाहितेचा छळ; चौघांवर गुन्हा

**सोलापूर** : लग्नामध्ये तुझ्या आई-वडिलांनी मानपान केला नाही तसेच पुणे येथे आम्हाला घर बांधायचे आहे.तु तुझ्या आई-वडिलांकडून चार लाख रुपये घेऊन ये म्हणत विवाहितेला शारीरिक व मानसिक त्रास देत छळ करून नांदाविण्यास नकार दिल्याप्रकरणी पतीसह चार जणांविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना जानेवारी २०२० ते आज तगायापर्यंत फिर्यादी यांच्या सासरी घडली.याप्रकरणी गौरी स्वप्निल इनामदार (वय-२२,रा. रेल्वे लाईन,वळसंगकर ब्लॉक, महापौर बंगला) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून पती स्वप्नील इनामदार,सासू सुनिता इनामदार,सासरे सुनील इनामदार, दीर सचिन इनामदार (सर्व. आसंगी, ता.जत, जि.सांगली) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास हवालदार इनामदार हे करीत आहेत.

### ट्रक चालकाचा मोबाईल पळवला

मार्केट यार्ड परिसरात ट्रकमध्ये मोबाईल पाहत असलेल्या चालकाचा मोबाईल दोन तरूणांनी झटापट करत हिस्कावून नेले. ही घटना २ एप्रिल रोजी घडली. याबाबत इरफान जाफर हुसेन (वय-३३,रा.आरोळी,रायचूर) यांनी जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.फिर्यादी हुसेन हे २ एप्रिल रोजी दुपारी आपल्या ट्रकमध्ये मोबाईल बघत बसले होते.तेव्हा दोन अनोळखी इसम ट्रमध्ये आले. त्यांनी इरफान यास झटापट करत त्यांना ट्रकमधून धक्का देऊन खाली पाडले.तसेच त्यांच्या हातातील वीस हजारांचे मोबाईल जबरदस्तीने हिसकावून मोटारसायकलवर पळून गेले. तपास स.पो.नि. पवार करत आहेत.





### आसरा चौकातून दुचाकी पळवली

शहरात विविध दोन ठिकाणाहून मोटारसकल चोरीला गेल्या. आसरा चौक येथे सुलतान कॅफे समोर पार्क करून ठेवलेली दुचाकि (क्र.एमएच.१३.डीएल.५४९७) अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. ही घटना दि.५ एप्रिल रोजी दुपारी एक ते सव्वा एक वाजण्याच्या दरम्यान घडली. याप्रकरणी प्रशांत महादेव सूर्यवंशी (वय-२८,रा. कुमठे गाव) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. तपास पोलीस हवालदार हार हे करीत आहेत. डोणगाव रोड लक्ष्मी विष्णू चाळ समोरील नागोबा मंदिर येथे अमोल खंडू सुरवसे (वय-३५,रा.उत्तर कसबा) यांनी मोटारसायकल (एम. एच.१३.सीएल.२३३२) ही पार्क करून ठेवली असता चोरट्याने चोरून नेली आहे. तपास पोलीस हवालदार उपासे हे करीत आहेत.

### इंद्रधनू अपार्टमेंटमध्ये ५७ हजारांची चोरी

घरात कोणी नसताना चोरट्याने हरवलेल्या कुलूपाच्या चावीच्या सहाय्याने घरात प्रवेश करत बेडरूममधील फर्निचरच्या कपाटातील ड्राव्हरमधील ५७ हजार रुपये चोरले.याबाबत मधुकर मारुती गवळी (वय-६०,रा.यु विंग इंद्रधनू अपार्टमेंट, मरिआई चौक) यांनी फौजदार चावडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

## नाट्य रसिकांची संख्या वाढीसाठी प्रयत्न करण्याची गरज

### ज्येष्ठ अभिनेते प्रशांत दामले यांचे मत

सुराज्य/सोलापूर



लोक पैसे देऊन नाटकाचे तिकिट काढतात. त्यांचं चीज झालं पाहिजे. नाट्यसृष्टीतील मंडळींनी मेहनत घेऊन विचार करून नाटके काढली पाहिजेत. सध्या नाटके उत्तम चालू आहेत असे सांगतानाच नाट्य रसिकांची संख्या वाढण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत, अशी अपेक्षा ज्येष्ठ अभिनेते प्रशांत दामले यांनी व्यक्त केली.

अखिल भारतीय नाट्य परिषद सोलापूर शाखेच्या वतीने आज शुक्रवारी सोलापुरात कलावंत मेळाव्यासाठी आले असताना सोलापूर श्रमिक पत्रकार संघात आयोजित वार्तालाप कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी विचार मंचावर नाट्य परिषद सोलापूर शाखेचे प्रशांत बडवे, विजय साळुंखे , संघाचे सरचिटणीस समाधान वाघमोडे , अश्विनी तडवळकर आदी उपस्थित होते.

#### ...तरच आपण शासनाकडे मदत मागू शकतो

शासनाकडे काही मागण्यापूर्वी आपलाही हिस्सा राखून ठेवला पाहिजे, हे दाखवून दिले पाहिजे तरच शासनाकडे मदत मागण्याचा आपल्याला अधिकार पोहोचतो. शासनाकडून मदत मागण्याआधी आपला हिस्साही अगोदर जमवला पाहिजे, असे आवाहनहीदामले यांनी यावेळी केले.

कोरोना काळात आणि कोरोनाच्या नंतरच्या काळात खूप काही शिकता आलं, रंगकर्मीनीही यातून बोध घेतला. त्यातून काही शिकायला हवं हे समजलं. कलावंतांनी आपल्या हातातील सर्व पैसे उधळू नयेत. पूर्वी आई - वडील सांगत असत की कमावलेले पैसे थोडे राखून ठेवा. आज त्याची जाणीव होत आहे. आपणाला मिळालेल्या पैशातून रंगकर्मींनी काही भाग राखून ठेवला पाहिजे. तसा विचार सर्वांनी आता करण्याची गरज आहे. महाराष्ट्राची सुमारे १३ कोटी लोकसंख्या आहे. त्यापैकी किमान ५० लाख नाट्य रसिक आहेत असे गृहीत धरले तरी कितीतरी नाट्यगृह चालू शकतील. मराठी नाटक कसे बंद होऊ शकतात ? याचा विचार व्हायला हवा. माझ्या चार नाटकांचे एक हजाराहून अधिक प्रयोग झाले. नाट्यगृहात पुढचा आणि मागचा प्रेक्षक वाढला पाहिजे,असे दामले म्हणाले.

## पैशाच्या कारणावरून दगडाने मारहाण; तरुणावर गुन्हा

सुराज्य/सोलापूर

हात उसने पैसे देण्या-घेण्याच्या कारणावरून तरुणाला लाथाबुक्क्यांनी मारहाण करत डोक्यात दगड घालून जखमी केल्याची घटना दि.६ एप्रिल रोजी संगम हॉटेल विनायक नगर येथे घडली.याप्रकरणी नागेश दत्तात्रय भंडारी (वय-२३,रा.सिद्धरामेश्वर नगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. सत्यनारायण ईरण्णा भंडारी (वय-२४, रा.सिद्धरामेश्वर नगर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. भंडारी व त्यांचा मित्र राजू असे दोघेजण संगम हॉटेल येथे चहा पीत बसले होते. त्यावेळी नागेशचा चुलत भाऊ सत्यनारायण भंडारी तेथे आला. त्यावेळी दोघात पैशाच्या कारणावरून वाद झाला. त्यावेळी सत्यनारायणने नागेशला शिवीगाळ केली व दगड उचलत डोक्यात मारून जखमी केले तपास पोलीस हवालदार पवार हे करीत आहेत.

## सेतू कार्यालय तात्काळ सूरु करा : आ. शिंदे

सुराज्य/सोलापूर



सोलापूर येथील सेतू कार्यालय अचानक बंद करण्यात आले आहे. यामुळे शहरातील बहुसंख्य विद्यार्थी व नागरीकांना शैक्षणिक वइतर बाबींसाठी लागणारे उत्पन्न दाखला, जातीचा दाखला, रहिवासी दाखला काढण्यासाठी सेतू कार्यालय सुरू ठेवणे आवश्यक आहे. हे कार्यालय बंद असल्यामुळे विद्यार्थी व नागरीक यांना अनेक अडचणी निर्माण होत आहेत. सेतू कार्यालयाची निविदा तात्काळ काढून सेतू कार्यालय चालू करावे अशी मागणी आ. प्रणिती शिंदे यांनी जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांच्याकडे केली आहे.

सातारा, सांगली,पुणे या ठिकाणी सेतू कार्यालय सूरू आहेत. परंतु सोलापूरातच सेतू कार्यालय बंद करण्यात मागे नेमका काय उद्देश आहे हे समजून येत नाही.

सेतू कार्यालय बंद करण्याबाबत शासनाच्या वतीने कोणतेही आदेश दिले नसल्याचे समजते. सोलापूर सेतू कार्यालय टेंडर ३१ मार्च २०२३ रोजी संपत होते त्या आधी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून जुन्या कंत्राटदारास मुदतवाढ देणे अथवा नवीन टेंडर काढणे गरजेचे आहे.

परंतु तसे झालेले नाही. सेतू कार्यालय सुरु करण्यासाठी विद्यार्थी व नागरिकांनी आपल्याकडे व्यथा मांडली आहे. नागरिकांची होणारी पैशांची लूट लक्षात घेऊन सेतू कार्यालय तत्काळ सूरू करा, अशी मागणी आ. शिंदे यांनी केली.

## आरोपीची बालसुधारगृहात रवानगी

### आसरा चौकातील खून प्रकरण

सुराज्य/सोलापूर

#### घटनाक्रम अचंबित करणारा

एकजण अंडा ऑम्लेट गाड्यावरचा कांदा कापण्याचा चाकू दोरी कापण्याच्या निमित्ताने नेतो...अन् थोड्याच वेळात खुनी हल्ल्याचा प्रकार पुढे येतो...फरशीवर सांडलेले रक्त पाहून त्या गाळ्यात काही विपरीत घडल्याची शंका येते. त्याहून भयानक वास्तव पुढे येणे... जखमी रक्ताच्या थारोळ्यात पडलेला असताना शेजारी आरोपीचे निर्विकारपणे बसून असणे.. त्याने केलेल्या कृत्यासंबंधी त्याचा भाव निर्विकार असणे, हा घटनाक्रमच सामान्यांना अचंबित करणारा असल्याचे दिसून आले.

अल्पवयीन मुलाने कांदा कापण्याच्या चाकूने तरुणाचा गळा चिरून खून केल्याचा थरारक प्रकार गुरुवारी दुपारी घडला. याप्रकरणातील आरोपी अल्पवयीन असल्याने, विधीसंघर्षग्रस्त बालक म्हणून त्याची रवानगी बाल सुधारगृहात करण्यात आल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. याप्रकरणी सरकार पक्षातर्फे पोलीस निरीक्षक अजय जगताप यांनी फिर्याद दाखल केली आहे. पूर्वीच्या भांडणावरून हा खून केल्याचे कारण सांगण्यात आले आहे.

या प्रकरणातील मृताचे नाव अजित मल्लिकार्जुन कोलार (रा.सिंदफळ, तालुका तुळजापूर) असे आहे. त्याच्या नात्यातील अल्पवयीन मुलगा आसरा चौकातील श्रद्धा व्हिडिओ गेम येथे काही दिवसापासून काम करीत होता. अजितला सतत दारू अन् गांजा पिण्याची सवय होती. दोघांमध्ये यापूर्वीही भांडणे झाली होती. या घटनेच्या दिवशी तो मुलगा नेहमीप्रमाणे कामास आला. त्याने दुकान उघडून सर्वसाफसफाई केली.त्यादरम्यान मृत अजित त्याठिकाणी आला. त्यावेळी मागील भांडणाच्या रागातून त्यांच्या वादावादी सुरू झाली. त्याचे रूपांतर मारामारी झाल्यानंतर आरोपीने अंडा बुर्जीच्या गाड्यावरील चाकू घेऊन अजितचा गळा कापला. त्यातच त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी पोलीस निरीक्षक अजय जगताप यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल झाला आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळकृष्ण हनपुडे-पाटील हे पुढील तपास करत आहेत. घटनास्थळाला वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी भेट दिली आहे.



मृत अजित कोलार

## बार्शीत एकास मारहाण

**बार्शी** : माझ्या हॉटेलचे स्टेटस का ठेवत नाहीस असे म्हणून हॉटेलमध्ये रात्रीच्यावेळी बोलावून मारहाण करून मारहाण करण्याचा प्रयत्न करताना सोडावण्यास आलेल्या मित्रास व वडिलांनीही धक्काबुक्कि केल्याने पोलिसात एकावर गुन्हा दाखल करण्यात आला. ही घटना ५ रोजी रात्री अभिजित हॉटेलमध्ये घडली. याबाबत जखमी महेश अशोक राऊत (रा. वाणी प्लॉट, बार्शी) यांनी शहर पोलिसात तक्रार देताच हॉटेलचे मालक अभिजित अशोक राऊत (रा.अशोक नगर) याच्या विरुद्ध मारहाणीचा गुन्हा दाखल केला आहे. यातील जखमी महेश राऊत याचे कटिंग सलुन व्यवसाय करत आहे. त्याची व अभिजित राऊत याची ओळख होती. व्यक्तिप्रेमातुन तो दोस्त म्हणून त्याचे व्हॉट्सअप त्यांचे स्टेटस ठेवत होता. परंतु गेली सहा महिन्यांपासून वाद झाल्याने दोघात वाद झाला. पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल भोंग करत आहेत .

## आनंदाच्या शिधाचे वाटप चालू

### राज्यातील पहिला मान पंढरपुरातील लक्ष्मी टाकळीला

सुराज्य/सोलापूर

**दवाळीच्या धर्तीवर रेशन दुकानदार माध्यमातून कार्डधारकांना शंभर रुपयात रवा, चणाडाळ, साखर आणि एक किलो तेल याप्रमाणे चार वस्तूचे किट सर्व रेशनदुकानात दाखल झाल्याने अन्नसुरक्षा सप्ताहचे औचित्य साधत आनंदाच्या शिधाचे वाटप चालू झाले आहे.राज्यातील किट वाटपाचा पहिला मान पंढरपुरातील लक्ष्मी टाकळी येथिल राणी कदम यांच्या दुकानाला मिळाला असल्याचे बोलेले जात आहे.**

गुढीपाडव्याला येणारा शिधा शासकिय कर्मचाऱ्यांच्या संपामुळे विघ्न निर्माण झाले होते. संप संपल्यानंतर शासनाने गतिमान हालचाली करून शिधा राज्यातील सर्व शासकिय गोदामांमध्ये दाखल झाला आहे.

शहर जिल्ह्यातील सर्व गोदामा मध्ये हा आनंदाचा शिधा पोहोचला आहे. असून चार दिवसात जिल्हा पुरवठा विभागाच्या वतीने आणि अन्नधान्य वितरण अधिकारी रेशन दुकानदार संघटनेच्या मदतीने आनंदाच्या शिधाचे किट शहरातील रेशन दुकानदारापर्यंत पोहला आहे ३एप्रिल रोजी ७१ दुकाने, ४ एप्रिल रोजी ११० दुकानात तर ५ एप्रिल रोज ७९ दुकानदारपर्यंत पोहचला आहे. आज ६ एप्रिल रोजी राहिलेल्या ५५ दुकानदारापर्यंत दुपार पर्यंत दाखल झाला शहरातील अंत्योदय योजनेखालील ६ हजार १४५, तर अन्नसुरक्षा योजनेतील १ लाख ९ हजार ८०४ कार्ड धारकांना तर ग्रामिण भागातील अंत्योदय योजनेतील ५४ हजार ३४७ तर अन्नसुरक्षा योजनेतील ३ लाख ५१ हजार २२१ कार्डधारकांना आनंदाचा शिधाचे वाटप केले जाणार आहे.

शुक्रवार पासून किटचे वाटप चालू झाले आहे. १४ एप्रिल पर्यंत वाटप चालू राहणार आहे. त्यामुळे नागरिकांनी आनंदाचा शिधाचे किट घेऊन जावे असे आवाहन वितरण विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

जिल्हामध्ये सर्व रेशन दुकानादारांपर्यंत किट पोहचले आहे. जिल्हातील वाटपचा शुभारंभ पंढरपुर येथिल लक्ष्मी टाकळी येथिल राणी कदम यांच्या दुकानातून करण्यात आला. राज्यातील वाटप करण्यात आलेले किट असल्याचे पुरवठा विभागाच्या वतीने सांगण्यात आले.

सोलापूर शहरातील सर्व दुकानदारांनी आज पासून आनंदाचा शिधा वाटप केला आहे. शहरातील ड परिमंडळ कार्यालयातील असलेल्या रास्त धान्य भाव दुकानदारांकडून वाटप चालू करण्यात आले यावेळी पुरवठा विभागाचे अनिल शहापुरे यांच्यासह रेशनदुकानदार संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.



शासनाकडून प्राप्त झालेल्या आनंदाचा शिधा वाटप चालू झाले आहे. विना तक्रार किट वाटप केले जात आहे. डॉ. बाबासाहेब आबेडकर जयंती पर्यंत किटचे वाटप केले जाणार आहे. याला ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.

**-नितीन पेंटर (जिल्हासमन्यवयक रेशन दुकानदार संघटना)**

## सोने देतो म्हणून डॉक्टरला बारा लाखांना फसविले

सुराज्य/सोलापूर

करस्टम लिलावामधील सोने स्वस्त दराने घेऊन देतो असे सांगत डॉक्टराकडून बारा लाख रुपये घेत सोने न देता फसवणूक केल्याप्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल झाला आहे. डॉ. विनोद कोल्हापूरे (वय-४३,रा.दक्षीण सदर बझार) यांनी जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

महादेव कलशेट्टी (रा.भवानी पेठ), अर्चना बैजू पानीकर (रा. हडपसर) यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. डॉ. कोल्हापुरे यांचा मित्र महादेव याने व त्याच्या ओळखीतील आरोपी अर्चना यांनी कोल्हापूरे यांनी कस्टमच्या लिलावातील सोने प्रतितोळे ३५ हजार रुपयाप्रमाणे देतो असे सांगत १२ लाख २५ हजार रुपये रोख घेतले. त्यानंतर दोघांनी सोनेही दिले नाही आणि पैसे देण्यास देता टाळटाळ केली. तपास पोसई व्हट्टे करत आहेत.

## भरदिवसा बार्शीत घरफोडी; रोख रकमेसह आठ लाखांची चोरी

सुराज्य/बार्शी

बार्शी शहरातील सुभाषनगर भागात रहात असलेले सेवानिवृत शिक्षकाचे भरदिवसा बंद घराचे कुलुप चोरट्यांनी तोडून घरातील कपाटातील ६० हजार रु रोख रकमेसह सोन्याचांदीचे दागिने असा ८ लाख रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना घडली. ही चोरीची घटना ६ रोजी घडली. याबाबत राजकुमार काशिनाथ मांगलकर ६४ (रा.सुभाषनगर ममता शाळेजवळ बार्शी) यांनी शहर पोलिसात फिर्याद दिली आहे.

या घरफोडीत चोरट्यांनी रोख ६० हजार रुपयासह,१ लाख ६० हजाराच्या चार तोळ्याच्या पाटल्या, २ लाखांचे पाच तोळ्यांचे गंठण, २ लाखांचे पाच तोळ्यांची बोरमाळ, ८० हजारांचे २ तोळ्यांचे कर्णफुले, ४० हजाराचे १ तोळ्यांचे मंगळसूत्र, २० हजाराची ५ ग्रॅमची सोन्याची अंगठी,१२ हजारांची ३ ग्रॅमची अंगठी व इतर चांदीचे साहित्य असा मुद्देमाल चोरून नेला आहे. मांगलकर हे दिवशी सकाळी आगळगाव येथील शेतातील ज्वारी मशागत करन्यासाठी शेतात गेले होते. त्यांची पत्नी कुसळंब येथील जि.प. प्राथमिक शाळेत मुख्याध्यापिका असून यादिवशी त्या शाळा संपल्यानंतर घरी येऊन पुणे येथे असलेल्या मुलाला भेटण्यास घरास कुलूप लावून गेल्या होत्या. चोरट्यांनी येऊन प्रथम गेटचे कुलुप तोडले आत जाऊन लाकडी दरवाजाचे कुलूप तोडून आत जाऊन लाकडी कपाट उचकटून त्यातील वरील ऐवज घेऊन लुटून नेला.

#### चोरटे सीसीटीव्हीत कैद

चोरी करून पसार झालेले चोरटे सीसीटीव्हीत कैद झाले आहेत. दोन आरोपी असून येऊन त्यातील एकाने हेल्मेट घातली असल्याचे शेजारी असलेल्या घरमलकाच्या सीसीटीव्ही मध्ये दिसले आहेत. तपास पोलीस निरीक्षक संतोष गिरीगोसावी करत आहेत.